

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक ३०१ * नांदेड * शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

गोदाकाठावर 'दिवाळी पाडवा पहाट' कार्यक्रमात रंगली हिंदी-मराठी गीतांची अविस्मरणीय संगीत मैफल; हजारो रसिकांचा उत्स्फूर्त सहभाग

- शेतकऱ्यांना समर्पित कार्यक्रमाचे शेतकऱ्यांच्याच हस्ते करण्यात आले उद्घाटन
- प्रसन्न, भक्तीमय वातावरणात चालली सुरांची जादू; नागरिकांची भरभरून दाद







नांदेड (प्रतिनिधी)– दिवाळी पाडव्याच्या मंगलमय पर्वावर नांदेड शहरातील रम्य गोदावरी नदीकाठावर बंदाघाट येथे आयोजित शेतकऱ्यांना समर्पित भव्य दिवाळी पाडवा पहाट या संगीतमय कार्यक्रमाने हजारो संगीतप्रेमी रसिकांची मने जिंकली. हा भव्य सांस्कृतिक सोहळा नांदेड उत्सव समिती, गुरुद्वारा बोर्ड, स्वरमेघ म्युझिक कल्चर आणि दैनिक गोदातीर समाचार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. विशेष बाब म्हणजे शेतकऱ्यांना समर्पित या कार्यक्रमाचे शेतकऱ्यांच्याच हस्ते उद्घाटन करण्यात आले.

हदगाव तालुक्यातील बरड शेवाळा येथील शेतकरी दांपत्य लक्ष्मीबाई आणि गंगाधरराव गणपतराव शिंदे तसेच शेतकरी विनायकराव काळे आणि शेतकरी परशुराम काळे यांच्याहस्ते या कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमास विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, कॅबिनेट मंत्री दर्जा प्राप्त विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील, नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, योगगुरू सीताराम सोनटक्के गुरुजी, नगरसेवक आशुतोष जोशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची तसेच हजारो रसिक प्रेक्षकांची उपस्थिती होती. योगगुरु सोनटक्के गुरुजी यांनी डी मार्ट, वाडी येथून दौड करत बंदाघाट येथे कार्यक्रमस्थळी हजेरी लावली.

या सोहळ्यात प्रख्यात गायिका मेघा गायकवाड, छत्रपती संभाजीनगरहून खास आलेले सुप्रसिद्ध गायक, संगीतकार दीपक गिरी, युवा गायक शुभम गोसावी यांच्यासह या कार्यक्रमाचे संयोजक तथा संपादक केशव घोणसे पाटील यांनी विविध हिंदी-मराठी गीतं सादर केली. यास उपस्थित हजारो रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. गायिका प्रभा पत्की, अनु नितनवरे यांनीही मराठी गीतं सादर केली.

कार्यक्रमात सहभागी गायकांनी आपल्या सुमधुर, भावस्पर्शी आणि भक्तिरसाने ओतप्रोत गायकीने रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात भक्तिगीते, अभंग आणि लोकप्रिय हिंदी-मराठी गीतांच्या सुरांनी संपूर्ण गोदाकाठ भक्तिमय आणि संगीतमय झाला.

मेघा गायकवाड यांची शास्त्रीय बाजाची गाणी

शास्त्रीय गायनाचा बाज असलेल्या सुप्रसिद्ध गायिका मेघा गायकवाड यांनीही आपल्या सुरेल गायनाने मैफलीची रंगत वाढवली. मेघा गायकवाड यांच्या राम भजन कर मन, आज सोनियाचा दिनू, जय शारदे वागेश्वरी, वृक्षवल्ली आम्हा सोयरी, शाम तेरी बन्सी, काळ्या मातीत मातीत या गीतांसह इतरही विविध एकल, युगुल गीते सादर केली.

अनुप जलोटा यांचे शिष्य दीपक गिरी, शुभम गोसावी यांची सरस गीतं

दीपक गिरी आणि शुभम गोसावी यांच्या 'सांसों की माला पे', 'नाम तुझे बरवे गा शंकरा', 'ऐसी लागी लगन', 'राम आएंगे' यांसारख्या एकाहून एक सरस गीतांच्या सादरीकरणाला रसिकांनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात आणि उत्स्फूर्त प्रतिसादात भरभरून दाद दिली.

संपादक केशव घोणसे पाटील यांची हिंदी-मराठी गीतं

गायकीची कोणतीही पार्श्वभूमी नसताना गेल्या काही काळापासून सातत्याने गायनाचा छंद जोपासत







विविध कार्यक्रमात सहभाग घेत असलेले संपादक केशव घोणसे पाटील यांनी विविध हिंदी-मराठी गीतं सादर केली. यात 'या जन्मावर या जगण्यावर, काळ्या मातीत मातीत, राजा ललकारी अशी दे' ही मराठी गीतं तसेच शाम तेरी बन्सी पुकारे राधा शाम आणि तुने मुझे बुलाया शेरावालीये ही अगदी वेगळ्या धाटणीची हिंदी गीतं त्यांनी सादर केली.

विशेष म्हणजे, हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या नांदेडकर संगीतप्रेमींनी प्रत्येक गीताला दिलेला मनमोकळा प्रतिसाद, टाळ्यांचा गजर आणि कलाकारांप्रती व्यक्त केलेले प्रेम यामुळे ही संगीत मैफल खऱ्या अर्थाने अविस्मरणीय ठरली. वाद्यवृंदातील कलाकारांच्या सुरेल साथीने या मैफलीला विशेष उंची प्राप्त झाली. नईम शेख, महेंद्र कदम, आदित्य डावरे, रवी भद्रे आणि परमानंद जाधव या वादकांनी साथसंगत दिली. ध्वनी व्यवस्था संतोष गट्टाणी आणि प्रकाश सेनगावकर (सोलापूर) यांनी तर छायांकनाची जबाबदारी रामकृष्ण सुर्वे आणि विनोद कळसकर यांनी सांभाळली.

या कार्यक्रमाचे निवेदन दिवाकर चौधरी यांनी केले. संयोजन समितीतील डॉ.हंसराज वैद्य, इंजि.संजीवन गायकवाड, भार्गव राजे, बालाजी इबितदार, बालाजी इंगळे खानापूरकर, प्रल्हाद कांबळे, आशुतोष आणि हर्षवर्धन घोणसे पाटील यांनी विशेष उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नांदेड उत्सव समिती, स्वरमेघ म्युझिक कल्चर आणि दैनिक गोदातीर समाचार परिवारातील सर्वांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी या कार्यक्रमाचे संयोजक, संपादक व गायक केशव घोणसे पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



















जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

संवादाचा धोकादायक अभाव

भारतीय लोकशाहीचे सर्वांत मोठे सामर्थ्य हे विविध विचारधारा, मतमतांतरे आणि विरोधी भूमिका यांना सामावून घेण्याच्या तिच्या क्षमतेत आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मतभेद असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे; मात्र हे मतभेद चर्चेच्या माध्यमातून सोडविण्याऐवजी संघर्ष, आरोप-प्रत्यारोप आणि वैयक्तिक टीकेच्या पातळीवर पोहोचत असतील, तर ती लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरते. सध्या भारतीय राजकारणात नेमकी हीच परिस्थिती निर्माण झाली आहे. राजकीय नेत्यांकडे बोलण्यासाठी व्यासपीठे भरपूर आहेत; परंतु एकमेकांचे म्हणणे ऐकून घेण्याची आणि संवादातून मार्ग काढण्याची तयारी नामशेष होत चालली आहे. परिणामी, संसदेच्या पवित्र सभागृहात व्हायला हवी असलेली चर्चा रस्त्यांवरील आणि माध्यमावरील आरोप-प्रत्यारोपांत हरवताना दिसत आहे. ब्रिटनचे माजी पंतप्रधान क्लेमेंट ॲटली यांनी लोकशाही म्हणजे चर्चेच्या माध्यमातून चालणारे सरकार, अशी व्याख्या केली होती. मात्र आजच्या भारतीय राजकारणाकडे पाहता लोकशाहीतील चर्चेची जागा संघर्षाने घेतल्याचे चित्र दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यातील अलीकडील शाब्दिक संघर्ष हे त्याचे उदाहरण आहे. राहुल गांधी यांनी पंतप्रधानांना खुल्या चर्चेचे आव्हान दिले, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मतदारयाद्यांच्या पुनरीक्षणाच्या मुद्द्यावर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची तयारी दर्शवली. त्याचवेळी भाजप आणि काँग्रेसकडून एकमेकांवर परकीय शक्तींशी संबंध असल्याचे गंभीर आरोप केले जात आहेत. दोन्ही बाजूंकडून चर्चेची भाषा केली जात असली, तरी चर्चेचे व्यासपीठ आणि त्यासाठी आवश्यक असलेली परस्पर विश्वासाची भावना निर्माण होताना दिसत नाही. या संघर्षाचे सर्वाधिक नुकसान संसदीय लोकशाहीचे होत आहे. संसदेचे कामकाज म्हणजे केवळ विधेयके मंजूर करण्याची प्रक्रिया नव्हे. सरकारला प्रश्न विचारणे, धोरणांमधील त्रुटी दाखवून देणे, जनतेच्या समस्या मांडणे आणि सत्ताधाऱ्यांना उत्तरदायी ठरवणे ही संसदेची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेचे कामकाज निर्धारित वेळेच्या केवळ १५ टक्के चालल्याची माहिती पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्चच्या आकडेवारीतून समोर आली आहे. प्रश्नोत्तराचा तास अवघ्या नऊ मिनिटांपुरता चालला. लोकसभेत मंजूर झालेल्या ११ पैकी नऊ विधेयकांवर मंत्र्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांनी एकही शब्द न बोलता ती मंजूर झाली. ही आकडेवारी संसदीय कामकाजातील घसरणीचे गांभीर्य स्पष्ट करते. यापूर्वीच्या अधिवेशनांमध्येही वारंवार कामकाज तहकूब झाल्याने कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक वेळ वाया गेला आहे. संसदेतील गोंधळासाठी सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांना जबाबदार धरतात. विरोधकांच्या मते, महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्याची संधी दिली जात नाही, त्यांचे प्रस्ताव फेटाळले जातात आणि विरोधी पक्षनेत्याला पुरेसा वेळ दिला जात नाही. तर सत्ताधाऱ्यांचा आरोप आहे की, विरोधक जाणीवपूर्वक कामकाजात अडथळे निर्माण करतात. या दोन्ही बाजूंच्या दाव्यांमध्ये काही तथ्य असू शकते; मात्र संसदेचे कामकाज ठप्प ठेवण्याचे समर्थन कोणत्याही बाजूला करता येणार नाही. बहुमताच्या जोरावर विधेयके मंजूर करणे म्हणजे संसदीय लोकशाही नव्हे आणि प्रत्येक मुद्द्यावर सभागृहाचे कामकाज रोखणे म्हणजे प्रभावी विरोधी पक्षाची भूमिका नव्हे. भारतीय राजकारणात पूर्वी तीव्र मतभेद असूनही संवादाचे दरवाजे खुले ठेवण्याची परंपरा होती. १९७१ च्या युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विरोधी पक्षांच्या नेत्यांशी संवाद साधला होता. राजीव गांधी यांनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना उपचारासाठी परदेशात जाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रांच्या प्रतिनिधीमंडळात स्थान दिले. १९९४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी काश्मीरच्या प्रश्नावर भारताची भूमिका मांडण्यासाठी विरोधी पक्षनेते वाजपेयी यांच्यावर जिनिव्हा येथील भारतीय प्रतिनिधीमंडळाची जबाबदारी सोपवली. वाजपेयी यांच्या काळातही विरोधकांशी संवाद आणि सहमतीचे राजकारण महत्त्वाचे मानले जात होते. मतभेद असले तरी राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर पक्षीय राजकारण बाजूला ठेवण्याची ही परंपरा भारतीय लोकशाहीचे सामर्थ्य होती. आज मात्र राजकीय विरोधकांना प्रतिस्पर्धी नव्हे, तर शत्रू समजण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आरोपांची भाषा अधिक आक्रमक होत असून, वैयक्तिक टीका आणि अपमानास्पद वक्तव्यांना राजकीय यशाचे साधन मानले जात आहे. सामाजिक माध्यमांनी या संघर्षाला आणखी खतपाणी घातले आहे. लोकसभेतील चर्चा, संसदीय समित्यांचे काम आणि धोरणात्मक संवाद यांपेक्षा रस्त्यांवरील शक्तिप्रदर्शन आणि दूरचित्रवाणीवरील वादविवादांना अधिक महत्त्व मिळत आहे. मात्र अशा चर्चांमधून प्रश्न सुटत नाहीत. संसदेतील नियमबद्ध चर्चा, अधिकृत नोंद आणि मतदान यांची जागा कोणताही राजकीय तमाशा घेऊ शकत नाही. याचा थेट परिणाम देशाच्या प्रशासनावर आणि जनतेच्या प्रश्नांवर होत आहे. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, आर्थिक विषमता, शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था यांसारखे महत्त्वाचे विषय राजकीय संघर्षाच्या गदारोळात मागे पडतात. संसदेत चर्चा न झाल्याने सरकारी धोरणांची पुरेशी छाननी होत नाही. परिणामी, लोकशाहीतील उत्तरदायित्वाची प्रक्रिया कमकुवत होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनाही आत्मपरीक्षण करावे लागेल. सरकारने विरोधकांना चर्चेसाठी पुरेसा वेळ द्यावा, महत्त्वाच्या विषयांवरील चर्चेचे प्रस्ताव स्वीकारावेत आणि विरोधी पक्षनेत्याच्या घटनात्मक स्थानाचा सन्मान करावा. विरोधी पक्षाच्या प्रमुखांनी बाहेर देशात जाऊन देशाची बदनामी करण्यापेक्षा संसदेमध्ये चर्चा करावी. लोकसभेतील उपाध्यक्षपदासारख्या महत्त्वाच्या संस्थात्मक तरतुदींची पूर्तता करण्याबाबतही गांभीर्याने विचार व्हायला हवा. दुसरीकडे, विरोधकांनीही संसदेचे कामकाज ठप्प करण्याऐवजी उपलब्ध संसदीय साधनांचा प्रभावी वापर करून सरकारला जाब विचारला पाहिजे. लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असतो, तर विरोधकांना प्रश्न विचारण्याचा आणि पर्यायी भूमिका मांडण्याचा अधिकार असतो. या दोन्ही भूमिकांचा समतोल राखला गेला तरच लोकशाही सक्षम राहते. संसद ही राजकीय नेत्यांच्या अहंकाराचे प्रदर्शन करण्याची जागा नसून देशाच्या भविष्यावर चर्चा करण्याचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. त्यामुळे नेत्यांनी संघर्षापेक्षा संवादाला, आरोपांपेक्षा युक्तिवादाला आणि पक्षीय स्वार्थापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. इतिहास रस्त्यांवरील शाब्दिक युद्धात कोण जिंकले, याची नोंद ठेवणार नाही; तर लोकशाहीच्या संस्थांचे रक्षण करण्यासाठी कोणी किती प्रामाणिक प्रयत्न केले, याचा हिशेब घेईल. भारतीय लोकशाहीला आज अधिक वादाची नव्हे, तर अधिक संवादाची गरज आहे.

पर्यावरणाबाबत बोलाचीच कढी; कृतीच्या नावाने मात्र शून्य!



पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण आणि प्रदूषणमुक्ती याबाबत आज सर्वत्र मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. जागतिक पर्यावरण दिन, वनमहोत्सव, वृक्षारोपण सप्ताह अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून दिले जाते. व्यासपीठावरून पर्यावरण वाचविण्याचे संदेश दिले जातात, सोशल मीडियावर पर्यावरण संवर्धनाचे आवाहन केले जाते; मात्र प्रत्यक्ष कृतीच्या वेळी अनेकांची उदासीनता दिसून येते. त्यामुळे पर्यावरणाबाबतची आपली भूमिका म्हणजे ३९;बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात अशी झाली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आज पर्यावरणाचा समतोल झपाट्याने बिघडत आहे. वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, बेसुमार वृक्षतोड, प्लास्टिकचा अतिवापर, वाहनांची वाढती संख्या आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनिर्बंध वापर यामुळे पर्यावरणासमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. एकीकडे तापमानवाढ, अनियमित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी आणि पूरस्थिती यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे, तर दुसरीकडे प्रदूषणामुळे मानवी आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. निसर्गाचा समतोल ढासळत असताना केवळ चर्चा आणि घोषणा करून परिस्थिती बदलणार नाही.पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जाते. वृक्षारोपणाचे फोटो काढले जातात, प्रसिद्धी मिळविली जाते आणि कार्यक्रम संपल्यानंतर त्या रोपांची जबाबदारी मात्र कोणीच घेत नाही. लावलेली हजारो रोपे पाण्याअभावी किंवा देखभालीअभावी वाळून जातात. दुसरीकडे रस्ते रुंदीकरण, बांधकामे आणि विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरूच असते. मग वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांचा नेमका उपयोग काय? झाडे लावण्यापेक्षा ती जगविणे अधिक महत्त्वाचे आहे, याची जाणीव समाजाने आणि प्रशासनाने ठेवली पाहिजप्लास्टिक प्रदूषण हीदेखील गंभीर समस्या बनली आहे.

प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत शासनाकडून वारंवार आवाहन केले जाते. बंदीचे निर्णय घेतले जातात; मात्र बाजारपेठा, दुकाने, सार्वजनिक ठिकाणे आणि पर्यटनस्थळांवर प्लास्टिकचा वापर सर्रास सुरू असतो. नद्या, नाले आणि जलस्रोतांमध्ये प्लास्टिक कचरा टाकला जातो. कचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने प्रदूषणाचा विळखा अधिक घट्ट होत आहे. केवळ कायदे करून पर्यावरणाचे रक्षण होणार नाही, तर त्यांची कठोर अंमलबजावणी आणि नागरिकांचा सक्रिय सहभागही आवश्यक आहे. जलसंधारणाबाबतही अशीच परिस्थिती आहे. पाणी वाचवा, पाणी अडवा, पाणी जिरवा, अशा घोषणा दिल्या जातात; परंतु पाण्याचा अपव्यय थांबविण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेतली जात नाही. भूजल पातळी खालावत आहे. अनेक ठिकाणी नद्या आणि तलाव प्रदूषित होत आहेत. पावसाचे पाणी साठविणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज बनली आहपर्यावरण संवर्धनाची जबाबदारी केवळ शासनाची किंवा एखाद्या पर्यावरणप्रेमी संस्थेची नाही. ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. घरापासूनच पर्यावरणपूरक सवयींचा अंगीकार करणे आवश्यक आहे.

प्लास्टिकचा वापर टाळणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे, झाडे लावून त्यांचे संगोपन करणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे आणि विजेचा अनावश्यक वापर टाळणे अशा छोट्या कृतींतून मोठा बदल घडू शकतो. शाळा आणि महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण दिले जात असले, तरी ते केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित राहू नये. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी प्रेम आणि संवेदनशीलता निर्माण झाली पाहिजे. पर्यावरणपुरक उपक्रम प्रत्यक्ष राबविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संघटना आणि प्रशासन यांनी पर्यावरण संरक्षणासाठी दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी दोघांमध्ये समतोल साधणे आवश्यक आहे. विकासाच्या नावाखाली जंगलांचा नाश, जलस्रोतांचे प्रदूषण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट सुरू राहिली, तर भविष्यात त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. पर्यावरणपुरक विकास ही केवळ संकल्पना न राहता ती प्रत्यक्षात उतरली पाहिजे. आज गरज आहे ती पर्यावरणाविषयी केवळ भाषणे देण्याची नाही, तर कृतीतून जबाबदारी सिद्ध करण्याची.

पर्यावरण दिनापुरते वृक्षप्रेम जागे होऊन चालणार नाही, तर वर्षाचे ३६५ दिवस निसर्ग संवर्धनाची जाणीव ठेवावी लागेल. घोषणा, संकल्प आणि आश्वासने यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष काम करण्याची वेळ आली आहे. कारण पर्यावरणाचे रक्षण म्हणजे केवळ निसर्गाचे रक्षण नव्हे, तर मानवी अस्तित्व आणि पुढील पिढ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवणे होय. पर्यावरणाबाबत बोलाचीच कढी करण्यापेक्षा कृतीची भाकरी भाजण्याची वेळ आता आली आहे!

-प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजी नगर
मो. ७८८८२९७८५९

दयाळूपणा : माणुसकीचा खरा अलंकार

माणसाचे मोठेपण त्याच्या संपत्तीमध्ये, पदामध्ये, अधिकारामध्ये किंवा प्रसिद्धीमध्ये नसून तो इतरांशी किती प्रेमाने, आदराने आणि संवेदनशीलतेने वागतो यामध्ये असते. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणे, त्याच्या अडचणी समजून घेणे, गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे आणि कोणत्याही अपेक्षेविना इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे दयाळूपणा होय. हा केवळ वैयक्तिक सद्गुण नसून मानवी नात्यांना जोडणारा, सामाजिक एकोपा वाढविणारा आणि मानवतेला समृद्ध करणारा जीवनमूल्यांचा आधार आहे. आजच्या धावपळीच्या, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान जीवनात भौतिक प्रगतीबरोबरच माणसाने मनातील संवेदनशीलताही जपली पाहिजे. याच मूल्याची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १३ नोव्हेंबर रोजी जागतिक दयाळूपणा दिन साजरा केला जातो.

जागतिक दयाळूपणा दिनाची संकल्पना आंतरराष्ट्रीय स्तरावर दयाळूपणाचा प्रसार करणाऱ्या संस्थांच्या प्रयत्नांतून पुढे आली. १९९७ मध्ये जपानमधील टोकियो येथे दयाळूपणासाठी कार्यरत असलेल्या विविध संस्थांचे प्रतिनिधी एकत्र आले. या बैठकीत दयाळूपणाला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी व्यापक चळवळ उभी करण्याचा विचार मांडण्यात आला. त्यातून जागतिक दयाळूपणा चळवळीला चालना मिळाली आणि १३ नोव्हेंबर १९९८ रोजी पहिला जागतिक दयाळूपणा दिन साजरा करण्यात आला. पुढे विविध देशांतील संस्था, सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था आणि नागरिक या उपक्रमात सहभागी होत गेले. भाषा, धर्म, जात, वंश, संस्कृती आणि राष्ट्रीयत्व अशा अनेक बाबतींत वेगवेगळे असलेले लोक दयाळूपणा या सार्वत्रिक मूल्यामुळे एकत्र येऊ शकतात. परस्परांविषयी आदर, सहानुभूती आणि सहकार्य वाढवून अधिक शांततामय समाज निर्माण करणे, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे.

दयाळूपणा म्हणजे केवळ एखाद्या गरजू व्यक्तीला आर्थिक मदत करणे किंवा तिच्यावर दया दाखवणे एवढाच मर्यादित अर्थ नाही. दुसऱ्याच्या भावना समजून घेणे, त्याच्या स्वाभिमानाचा आदर करणे, त्याच्या अडचणींकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि शक्य असेल त्या मार्गाने आधार देणे, ही त्याची व्यापक संकल्पना आहे. एखाद्या व्यक्तीला संकटाच्या वेळी धीर देणे, निराश झालेल्या माणसाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, वृद्ध व्यक्तीला मदत करणे,



विद्यार्थ्याला मार्गदर्शन करणे किंवा अनोळखी व्यक्तीशीही सौजन्याने वागणे, या सर्व कृती दयाळूपणाच्याच अभिव्यक्ती आहेत. काही वेळा मोठ्या आर्थिक मदतीपेक्षा प्रेमाचे दोन शब्द किंवा अडचणीच्या काळात सोबत उभे राहणे अधिक मोलाचे ठरते. त्यामुळे दयाळूपणा हा विशेष प्रसंगी व्यक्त करण्याचा गुण नसून दैनंदिन जीवनातील वर्तनाचा अविभाज्य भाग असला पाहिजे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. भ्रमणध्वनी, संगणक आणि समाजमाध्यमांमुळे काही क्षणांत जगाच्या कोणत्याही भागातील व्यक्तीशी संवाद साधणे शक्य झाले आहे. मात्र, या तांत्रिक जवळिकीबरोबर भावनिक जवळीक टिकविण्याचे आव्हानही निर्माण झाले आहे. अनेकदा एकाच घरात राहणारी माणसे आपापल्या भ्रमणध्वनीमध्ये व्यस्त असतात. शेजारी राहणाऱ्या व्यक्तीची अडचण माहीत नसते किंवा सार्वजनिक ठिकाणी एखाद्याला मदतीची गरज असली तरी अनेक जण दुर्लक्ष करतात. तंत्रज्ञानाचा वापर केवळ वैयक्तिक सोयीसाठी न करता माणसांना जोडण्यासाठी, मदतीचे जाळे निर्माण करण्यासाठी आणि सकारात्मक विचारांचा प्रसार करण्यासाठी केला पाहिजे. आभासी संवाद महत्त्वाचा असला, तरी प्रत्यक्ष भेट, आपुलकीची विचारपूस आणि सहकार्य यांना पर्याय नाही. आधुनिकतेचा स्वीकार करताना माणुसकीची ऊब हरवू न देणे ही काळाची गरज आहे.

दयाळूपणाचे पहिले संस्कार कुटुंबात घडतात. बालक आपल्या आई-वडिलांचे, आजी-आजोबांचे आणि घरातील इतर सदस्यांचे वर्तन पाहून शिकत असते. घरात एकमेकांशी प्रेमाने बोलणे, कामात सहकार्य करणे, अन्नाची नासाडी टाळणे आणि ज्येष्ठांचा आदर करणे या कृती बालकाच्या मनात संवेदनशीलतेची बीजे पेरतात. मुलांना केवळ स्पर्धेत यश मिळविण्याचे किंवा मोठे पद प्राप्त करण्याचे शिक्षण देऊन चालणार नाही, तर चांगला माणूस होण्याचे संस्कारही दिले पाहिजेत. मुलांच्या चुका समजावून सांगताना त्यांचा अपमान न करता संयमाने मार्गदर्शन करणे, हेही दयाळूपणाचे उदाहरण आहे. प्रेम, समता आणि परस्पर आदर असलेले कुटुंबच संवेदनशील समाजाचा पाया घालू शकते.

भारतीय विचारपरंपरेत करुणा, मैत्री, प्रेम, अहिंसा आणि परोपकार या मूल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. तथागत गौतम बुद्धांनी करुणा आणि मैत्रीभावाचा संदेश देताना सर्व प्राणिमात्रांविषयी सद्भावना बाळगण्याची शिकवण दिली. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव करून घेणे आणि ते कमी करण्यासाठी प्रयत्नशील राहणे, ही त्यांच्या विचारांची महत्त्वाची दिशा आहे. बुद्धांचा करुणेचा विचार माणसाला जात, धर्म, भाषा आणि सामाजिक स्थान यांपलीकडे जाऊन समतेने वागण्याची प्रेरणा देतो. भारतीय संतपरंपरेतही दया, प्रेम, परोपकार आणि मानवसेवा यांचा गौरव करण्यात आला आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रिया आणि वंचित घटकांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य सामाजिक संवेदनशीलतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायासाठी घेतलेले निर्णय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता व मानवी प्रतिष्ठेसाठी केलेला संघर्ष दुर्बल घटकांविषयीची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करतो. या विचारांचा खरा अर्थ केवळ सहानुभूती व्यक्त करणे नसून अन्याय दूर करण्यासाठी कृतीशील होणे हा आहे.

मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही दयाळूपणाचे महत्त्व मोठे आहे. आज अनेक व्यक्ती ताणतणाव, एकाकीपणा, निराशा, असुरक्षितता आणि भावनिक अस्वस्थता अनुभवत आहेत. बाहेरून आनंदी दिसणाऱ्या व्यक्तीच्या मनातही अनेक प्रश्न आणि वेदना असू शकतात. अशा वेळी तिचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, दोष न देता समजून घेणे आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत मिळवून देणे महत्त्वाचे ठरते. मानसिक त्रास सहन करणाऱ्या व्यक्तीची चेष्टा करणे किंवा तिला कमकुवत समजणे अयोग्य आहे. मानसिक आरोग्याविषयी मोकळेपणाने बोलण्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे. सहानुभूतीपूर्ण संवादामुळे व्यक्तीला आपण एकटे नाही, आपल्याला समजून घेणारी माणसे आहेत, अशी जाणीव होते. त्यामुळे दयाळूपणा हा भावनिक आधार आणि मानसिक स्वास्थ्य वाढविणारा महत्त्वाचा गुण आहे.

दयाळूपणाची व्याप्ती माणसांपुरती मर्यादित नाही. प्राणी, पक्षी, वनस्पती आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता बाळगणेही तितकेच आवश्यक आहे. उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी पाणी ठेवणे, भटक्या प्राण्यांना त्रास न देणे, जखमी प्राण्यांना मदत मिळवून देणे, झाडांचे संरक्षण करणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे या कृतींमधून निसर्गाविषयीची काळजी व्यक्त होते. पर्यावरणाचा ऱ्हास, प्रदूषण, पाण्याची टंचाई आणि हवामानातील बदल यांचे परिणाम संपूर्ण मानवजातीला भोगावे लागत आहेत. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. मानवाने निसर्गाचा केवळ उपभोग घेणारा घटक न राहता त्याचे संवर्धन करणारा जबाबदार घटक बनणे आवश्यक आहे.

दयाळूपणाचा प्रसार करण्यासाठी मोठ्या आर्थिक साधनांची किंवा भव्य उपक्रमांची आवश्यकता नसते. प्रत्येक व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनात साध्या कृतींमधून हा गुण जोपासू शकते. घरातील सदस्यांशी प्रेमाने बोलणे, कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांना मदत करणे, सार्वजनिक ठिकाणी शिस्त पाळणे, स्वच्छता राखणे, गरजू विद्यार्थ्याला पुस्तके देणे, रक्तदान करणे, वृद्ध व्यक्तींची विचारपूस करणे आणि आजारी शेजाऱ्याला मदत करणे या कृती समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. मदत नेहमी पैशाच्या स्वरूपातच असावी असे नाही. आपला वेळ देणे, कौशल्याचा उपयोग करून देणे, योग्य माहिती पुरवणे किंवा एखाद्याला आत्मविश्वास देणे यांनाही मोठे महत्त्व आहे. दयाळूपणाची कृती किती मोठी आहे यापेक्षा ती किती प्रामाणिक भावनेतून केली आहे, हे अधिक महत्त्वाचे ठरते.

आज जगासमोर युद्ध, हिंसाचार, गरिबी, विषमता, विस्थापन, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक संघर्ष अशी अनेक आव्हाने आहेत. या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी कायदे, धोरणे, विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक नियोजन यांची आवश्यकता आहेच; परंतु त्याचबरोबर मानवी संवेदनशीलता आणि परस्परांविषयीची बांधिलकीही आवश्यक आहे. केवळ भौतिक प्रगती झाली म्हणून समाज प्रगत होत नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येते का, दुर्बल घटकांना न्याय मिळतो का आणि गरजू व्यक्तीला मदतीचा आधार मिळतो का, यावर समाजाच्या प्रगतीचे खरे मोजमाप अवलंबून असते. दयाळूपणा माणसाला दुसऱ्याच्या वेदनांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची आणि त्या कमी करण्यासाठी कृती करण्याची प्रेरणा देतो. त्यामुळे शांततामय, समताधिष्ठित आणि मानवतावादी जगाच्या निर्मितीसाठी या मूल्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

माणसाचे खरे मोठेपण त्याने मिळविलेल्या संपत्तीपेक्षा इतरांच्या जीवनात निर्माण केलेल्या आनंदातून आणि दिलेल्या आधारातून व्यक्त होते. दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करणे, निराश मनाला धीर देणे, गरजू व्यक्तीला स्वावलंबी होण्यासाठी मदत करणे आणि प्रत्येकाच्या मानवी प्रतिष्ठेचा आदर करणे, यातच जीवनाचे खरे सार दडलेले आहे. दयाळूपणा हा दुर्बलतेचा नव्हे, तर अंतःकरणातील सामर्थ्याचा परिचय आहे. जागतिक दयाळूपणा दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या वर्तनाचे आत्मपरीक्षण करून दैनंदिन जीवनात अधिक संवेदनशील होण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण माणुसकीची ओळख मोठ्या घोषणांतून नव्हे, तर छोट्या कृतींतून निर्माण होते. दयाळूपणाची भावना मनात रुजून कृतीत उतरली, तर कुटुंब अधिक प्रेमळ, समाज अधिक सहिष्णू आणि जग अधिक शांततामय होऊ शकेल. म्हणूनच दयाळूपणा हा केवळ एक सद्गुण नसून माणुसकीचा खरा अलंकार आणि सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीचा भक्कम पाया आहे.

-डॉ. राजेंद्र बगाटे
हिंगोली

काळ नामांतराचा! यशोदाबाईंच्या आठवणी



डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाबर जीवापाड प्रेम करणाऱ्यांची संख्या देशात आणि जगभरात लाखो-करोडो आहे. या एका नावासाठी आपलं सर्वस्व पणाला लावणाऱ्या त्यांच्या अनुयायांची संख्या असंख्य आहे. नामांतराच्या काळात अनेकांनी आपल्या जीवाची बाजी लावून मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचं नाव मिळावं म्हणून शर्थीचे प्रयत्न केले आहेत. विरोधकांशी लढताना शहीद झालेल्यांची संख्याही खूप आहे. 'कापलो गेलो तरीही सोडले नाही तुला, जाळलो गेले तरी सोडले नाही तुला' या गीतांच्या बोलाप्रमाणे लोक वागत आले आहेत. अशा या महामानवाच्याप्रती प्रचंड आदराची भावना त्यांच्या अनुयायांमध्ये आहे. हे सर्वांना ज्ञात आहेच.

नामांतर लढ्यातील यशोदाबाई निलंगेकर यांच्याशी संवाद साधण्याचा नुकताच योग आला. त्यांनी सांगितलेल्या जुन्या पिढीतील कट्टर आंबेडकरी अनुयायांची जीवनगाथा नव्या पिढीतील तरुणांनाही प्रेरणादायी आहे.

नामांतराचा तो काळ... मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळालेच पाहिले म्हणून शेकडो अनुयायी पेटून उठले होते. तर नामांतर विरोधक मात्र बाबासाहेबांच्या नावाला जोरकस विरोध करीत होते. केवळ विरोधापुरता बिरोध न करता ते नामांतराचं आंदोलन चिरडून टाकण्यासाठी आंदोलनकर्त्यांच्या जीवावर उठले होते. अनेक आंबेडकरी अनुयायांना त्यांनी सळोकी पळो करून सोडले होते. जनार्धन मवाडे, पोचिराम कांबळे या सारख्या शुरविरांना या चळवळीत शहीद व्हावे लागले होते. खेड्यापाड्यातील अनेक कार्यकर्ते, लोक हैराण झाले होते. अशावेळी ते सुरक्षित जागा शोधीत होते. बाबुराव निलंगेकरांचे लालवाडीतील घर व शाळा अशा आंबेडकरी अनुयायांसाठी सदैव खुली होती. बाबुराव हे निर्भिड, धाडसी व्यक्तीमत्व आपल्याकडे आश्रयाला येणाऱ्यांची सर्वोतोपरी काळजी करणे, सहकार्य करणे हे त्यांनी आपले कर्तव्यमानले. ज्या ज्या लोकांना विरोधकांकडून आपल्या जीवाला धोका आहे असे वाटत होते ते सर्व बाबुराव निलंगेकर यांच्याकडे नांदेडला लालवाडीला आले. ३० पेक्षा जास्त कार्यकर्ते त्यांच्याकडे येवून राहिले. त्यांच्या सर्वांची राहण्या व खाण्याची सोय यशोदाबाई व बाबुराव यांनी केली.

यशोदाबाईंनी आपल्या नवऱ्यासोबत राहून नामांतर काळात अनेकांना हिंमत दिली. सरंक्षण दिले. नामांतर लढ्यातील लक्ष्मण हाटकर, जळबाजी पोटफोडे, आमदुरा येथील संताजी वाघमारे, सुनिल मोरे, कामाजी कोल्हे-काकांडी, कमलाकर मगरे, बामा सोनकांबळे (मुखेड), शिवाजी पंडित (तुप्पा), अनंत मांजरमकर यांसारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या आठवणीही यशोदाबाईंनी सांगितल्या.

शहीद गौतम वाघमारे व त्याकाळातील कट्टर आंबेडकरवादी युवा नेता सुनिल मोरे यांचेही अनेक प्रसंग सांगितले. नामांतर काळातील कठीण प्रसंगांना समर्थपणे तोंड दिले, पण उशिरा का होईना नामांतर म्हणता येणार नाही नामविस्तार झाला व विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव मिळाले याचा आनंद न मोजता येणारा आहे असेही यशोदाबाई निलंगेकर म्हणाल्या.

यशोदाबाई यांचा जन्म ५ ऑगस्ट १९४६ ला लालवाडी नांदेड येथे झाला. पुढे त्यांचे लग्न बाबुराव निलंगेकर यांच्याशी झाले. त्यांना ४ मुले व ४ मुली झाल्या. बाबुराव निलंगेकर लातूर जिल्ह्यातील निलंगा येथील. लग्नानंतर तेही लालवाडी नांदेड येथेच स्थाईक झाले. त्यांनी शिक्षणाचे महत्व लक्षात घेवून शाळा काढली. डॉ. आंबेडकर यांच्या कार्यकृत्वाने प्रचंड प्रभावीत झाले असल्याने बाबुराव निलंगेकर हे आपल्या जीवाची पर्वा न करता सामाजिक चळवळीत झोकून काम करु लागले. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांनी राजकारणात भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली त्या पक्षाचे ते पाहिले नगरसेवक म्हणून निवडूनही आले. त्यांचे आपल्या कार्यकर्त्यांवर जीवापाड प्रेम होते. यशोदाबाईसुद्धा आपल्या नवऱ्याच्या सामाजिक चळवळीत खारीचा वाटा देण्यासाठी सदैव तत्पर असायच्या कसलीही तक्रार न करता त्या आपल्या पतींना सहकार्य करत असत. त्यांच्या नामांतर लढ्यातील पुढाकार निश्चितच नोंद घेण्यासारखाच आहे.

- डॉ. राम वाघमारे,
नांदेड.

दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईवर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेतून चारा पिकांची लागवड करा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

सात प्रकारच्या सुधारित चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन



नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी हिरवा व कोरडा चारा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत चारा पिकांच्या लागवडीची कामे हाती घ्यावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. नैऋत्य मोसमी पावसातील तूट, एल निनोचा प्रभाव आणि रब्बी हंगामातील पेरणी क्षेत्रात संभाव्य घट यामुळे आगामी काळात चारा उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन गायरान जमिनी तसेच वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतजमिनीवर सुधारित चारा पिकांची लागवड करण्याची कामे मंजूर करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेंतर्गत मका, ज्वारी, बाजरी, नेपियर गवत, मेथी घास, ज्वारी मल्टीकट आणि बाजरी मल्टीकट अशा सात प्रकारच्या चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या पिकांसाठी हेक्टरी आर्थिक तरतूद व रोजगार निर्मितीचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार मका पिकासाठी ४७ हजार ३०७ रुपये व ९५ मनुष्यदिवस, ज्वारीसाठी ४२ हजार ७७८ रुपये व ८८ मनुष्यदिवस, बाजरीसाठी ३५ हजार ५०५ रुपये व ७४ मनुष्यदिवस, नेपियर गवतासाठी ७६ हजार ३१ रुपये व १५५ मनुष्यदिवस, मेथी घासासाठी १ लाख १३ हजार २९० रुपये व २७० मनुष्यदिवस, ज्वारी मल्टीकटसाठी ५१ हजार ३६ रुपये व १०० मनुष्यदिवस, तर बाजरी मल्टीकटसाठी ७६ हजार ४४ रुपये व १८० मनुष्यदिवस रोजगार निर्मितीची तरतूद आहे.

या लागवडीसाठी आफ्रिकन टॉल, एनएमएच-४०५३, न्यूट्री गोल्ड, सीएसव्ही-३३ एमएफ, न्यूट्रीफास्ट, यशवंत, जयवंत, सुपर नेपियर, आरएल-८८, सीओ-१, जायंट बाजरी आदी सुधारित वाणांचा वापर करता येणार आहे. आवश्यक बियाणे महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृभको, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्र यांसारख्या अधिकृत संस्थांमार्फत उपलब्ध करून घेता येईल. या योजनेत मजुरांच्या श्रमांना प्राधान्य देण्यात आले असून, मजुरांमार्फत करणे शक्य असलेल्या कामांसाठी यंत्रसामग्रीचा वापर करण्यास मनाई आहे. त्यामुळे चारा उत्पादनासोबतच ग्रामीण भागात स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे.

या कामांची अंमलबजावणी पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील वैयक्तिक शेतकऱ्यांनी तसेच ग्रामपंचायतींनी आपल्या कार्यक्षेत्रातील गायरान जमिनीवर आणि पात्र लाभार्थ्यांच्या शेतजमिनीवर चारा पिकांची लागवड करण्यासाठी पुढाकार घ्यावा. संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासोबतच पशुधनाचे संवर्धन आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती साध्य करण्यासाठी या योजनेचा प्रभावी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

बीडीओ आणि विस्तार अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची मनमानी?

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशालाच केराची टोपली; शंकरनगर परिसरात ग्रामपंचायतींचा कारभार ठप्प, पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांची भटकंती

शंकरनगर (प्रतिनिधी)– ग्रामीण जनतेला गावपातळीवर शासकीय सेवा, विविध दाखले आणि शासनाच्या योजनांचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली आहे. मात्र, शंकरनगर परिसरातील हिप्परगा, किनाळा, धुप्पा, कुचेली, टाकळी, बिजूर, कामरसपल्ली, रामतीर्थ, बोरगाव, थडी, आळंदी, आदमपूर व अटकळी, भोपाळा आदी गावांमध्ये ग्रामसेवकांच्या अनियमित उपस्थितीमुळे ग्रामपंचायतींचा कारभार विस्कळीत झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालयी उपस्थित राहण्याबाबत आदेश दिले असतानाही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. वरिष्ठांच्या आदेशाला अधीनस्थ अधिकारी आणि कर्मचारी जुमानत नसतील, तर या आदेशांचा उपयोग काय? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

ग्रामसेवक मुख्यालयी उपलब्ध नसल्याने जन्म-मृत्यू दाखले, विविध प्रमाणपत्रे, शासकीय योजनांची कामे आणि ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामांसाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. यासंदर्भात पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप आहे. ग्रामपंचायतींच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या गटविकास अधिकारी (बीडीओ) आणि विस्तार अधिकाऱ्यांकडूनच दुर्लक्ष होत असेल, तर ग्रामसेवकांवर कारवाई कोण करणार? वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला प्रत्यक्षात दुजोरा मिळतोय की केवळ कागदावरच आदेशांची अंमलबजावणी दाखवली जात आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

एकीकडे परिसरात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत असताना दुसरीकडे पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि मूलभूत सुविधांच्या तक्रारी सोडवण्यासाठी ग्रामपंचायतीत जबाबदार अधिकारी उपलब्ध नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. दिवाळीचे दिवस उलटूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसतील, वरिष्ठ अधिकारी तक्रारींकडे दुर्लक्ष करीत असतील आणि सामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी वणवण भटकावे लागत असेल, तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

शंकरनगर परिसरातील ग्रामपंचायतींच्या या परिस्थितीची मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी तातडीने दखल घेऊन अचानक तपासणी करावी, ग्रामसेवकांच्या मुख्यालयातील उपस्थितीची खातरजमा करावी आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

१७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात 'पेन्शन अदालत'

नांदेड (प्रतिनिधी)– महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक तसेच अन्य प्रशासकीय अडचणींचे निराकरण करण्यासाठी मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये संबंधित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पेन्शनसंदर्भातील तक्रारी व अडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे. यासाठी संबंधितांनी १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहून आपल्या तक्रारींचे निवेदन सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

भोकर तालुक्यातील अनेक गावांत विकली जाते अवैधरीत्या देशी दारू: युवा पिढी बनली व्यसनाधीन

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांची डोळेझाक

भोकर (प्रतिनिधी)– तालुक्यातील अनेक गावातं अवैधरित्या देशी दारूची विक्री केली जात असून, ग्रामीण भागात अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. युवा पिढी सुद्धा व्यसनाधीन बनली असून, गावा-गावांत भांडणाचे प्रकार वाढले आहेत.

तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक गावांमध्ये भोकरमधून अवैधरित्या देशी दारू विक्रीसाठी नेली जाते आणि गावामध्ये सर्रास विक्री होत असल्याने सहज दारू उपलब्ध होत आहे. या प्रकारामुळे नवयुवक, शाळकरी विद्यार्थी, कामगार, रोजंदारी मजूर व्यसनाच्या आहारी जाऊन अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. काही गावांमध्ये दारूबंदीसाठी महिलांनी पुढाकार घेऊन निवेदन दिले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. भोकर शहरातील परवानाधारक दुकानदारसुद्धा नियमबाह्य कारभार करीत असून त्यांच्यावर वचक राहिलेला नाही. बंद बारीच्या काळामध्ये सुद्धा मागच्या दाराने दारू विक्री केली जाते. काही गावांना वाहनांमधून दारू पुरविल्या जाते.

अवैध देशी दारू विक्रीवर आळा बसविण्यासाठी व परवानाधारक नियमानुसार देशी दारूची विक्री करतात की नाही यावर आळा बसविण्यासाठी तालुक्याला निरीक्षक नेमलेले असतात. भोकरचे निरीक्षक मात्र ह्या कुठल्याच बाबीकडे लक्ष न देत नसल्याच्या तक्रारी आहेत. रसायन मिश्रित सिंधीची विक्री केल्या जात आहे. उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक याकडे दुर्लक्ष करीत असून, ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये अनधिकृत देशी दारू विक्रीकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन ही दारू विक्री थांबविण्याची मागणी होत आहे.

आ. पाटील चिखलीकर यांनी केला कंधार ते लोहा बस प्रवास; पाच नव्या एसटीला हिरवा झेंडा



लोहा (प्रतिनिधी)– कंधार आगाराला दिवाळीच्या मुहूर्तावर पाच नव्या राजमाता जिजाऊ या नव्या बसला आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर कंधारहुन लोह्यापर्यंत त्यांनी बसने प्रवास केला. लालपरी ही सुरक्षित प्रवास देणारी आहे. त्यांनी लोहा बसस्थानकाची पाहणी करून प्रवाशांशी संवाद साधला.

कंधार आगाराला पाच नव्या राजमाता जिजाऊ बस मिळाल्या असून, शनिवारी दुपारी आगारात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते पाच नव्या बसचे पूजन करण्यात आले व हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यावेळी आगार प्रमुख अमर पाटील व मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर कंधारहुन लोह्याला त्यांनी याच नव्या बसने प्रवास केला. बसमध्ये प्रवास करताना त्यांनी प्रवाशाशी संवाद साधला.

लोहा बसस्थानकात एसटी आल्यानंतर त्यांनी एसटी प्रवास सुखकर व सुरक्षित असतो, बहुजन हिताय तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांची लालपरी खऱ्या अर्थाने जीवनदायिनी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही असा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यांनी लोहा बसस्थानकाची पाहणी केली. तसेच प्रवाशाशी संवाद साधला. सुविधांबाबत काही सूचना दिल्या.

यावेळी त्यांच्यासोबत उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, आगार प्रमुख अमर पाटील, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, दत्ता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, वाहतूक नियंत्रक मनोहर लांडगे, दत्ता शेटे, केतन खिल्लारे यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

शहरातील स्वामी समर्थ मंदिरालगत नमो उद्यान उभारण्यात आले आहे. त्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. सेवानिवृत्त वन विभागाचे उपसंचालक गोविंदराव बिडवई यांच्या पुढाकाराने हे स्वामी समर्थ मंदिर साकारले आहे. त्याच्या बाजूला अतिशय प्रशस्त असे नमो। उद्यान उभे राहिले आहे, त्याची आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पाहणी केली.

उमरी येथे शिवसेनेच्यावतीने गरजवंतांना शिधा वाटप



उमरी (प्रतिनिधी)– महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या पुढाकारातून उमरी तालुक्यातील गोरगरीब, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना दिवाळी सणाच्या निमित्त शिधा वाटप करण्यात आले.

दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण प्रत्येकाच्या घरात आनंदाने साजरा व्हावा, आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही गोरगरीब कुटुंबाचा सणाचा आनंद हिरावला जाऊ नये, या भावनेतून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

उमरी तालुक्यातील विविध गावांमध्ये गोरगरीब कुटुंबांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात देत एकनाथराव शिंदे यांनी गोरगरीब जनतेची दिवाळी गोड केली. उमरी येथे जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे यांच्या उपस्थितीत दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी लाडक्या बहिणींना शिध्याचे वाटप करण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष द. पेरेवार, उपजिल्हाप्रमुख प्रल्हाद पिंपळे, शहरप्रमुख शिवाजी शिंदे, ओबीसी प्रमुख शिवाजी हेमके, महिला आघाडी तालुका प्रमुख पार्वतीबाई दीक्षित, उपतालुकाप्रमुख प्रवीण पाटील ढगे, नायगाव तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर बेलकर, सुनील खांडरे, महेश पडोळे, कुलजीतसिंग बावरी, माधव सोळके, मुकीद बेग, प्रदीप दीक्षित, सुरेश उमाटे, गोपाल लोध, बालाजी वर्मा, प्रेम वैद्य आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या मराठवाड्याला वीज कामगार सोसायटीचा मदतीचा हात

मुख्यमंत्री सहाय्यता निधीस २ लाख ५१ हजार रुपयांचे योगदान



नायगाव (प्रतिनिधी)– मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचे परिणाम आता शेती आणि शेतकरी कुटुंबांच्या अर्थकारणावर स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि आर्थिक अडचणी अशा संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना मदतीची गरज असताना नांदेड येथील वीज कामगार को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने सामाजिक बांधिलकीचे भान राखत मुख्यमंत्री सहाय्यता निधीस २ लाख ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. संकटाच्या काळात केवळ सहवेदना व्यक्त न करता प्रत्यक्ष आर्थिक योगदान देण्याच्या सोसायटीच्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते आणि भाजपा नेते तथा नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटीचे चेअरमन रमेश वडगावे यांनी मदतीचा धनादेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे सुपूर्द केला.

यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने मराठवाड्यातील शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून, खरीप हंगामातील उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसमोर आर्थिक प्रश्न उभे राहिले आहेत. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्यासाठी शासनासह सामाजिक संस्था, सहकारी संस्था आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

शस्त्र परवान्यांचे नुतनीकरण करण्याचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील ज्या शस्त्र परवान्यांची मुदत ३१ डिसेंबर २०२६ रोजी संपत आहे, अशा परवानाधारकांनी मुदतीपूर्वी परवान्यांचे नुतनीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाने केले आहे.

नुतनीकरणासाठी नियमानुसार शुल्क चलनाद्वारे शासनाकडे जमा करणे आणि परवान्यात नमूद अग्निशस्त्राची जिल्हादंडाधिकारी कार्यालयात पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच विहित नमुन्यातील अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा, पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचा एक फोटो आणि शस्त्र परवान्याची छायांकित प्रत जोडून जिल्हादंडाधिकारी कार्यालयातील आवक-जावक शाखेत सादर करावी.

संबंधित परवानाधारकांनी नुतनीकरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड (प्रतिनिधी)– दिवाळी, गुरुतागद्दी सोहळा तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड जिल्ह्यात २२ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी किरण आंबेकर यांनी हे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या आसपास शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येणाऱ्या वस्तू बाळगण्यास मनाई आहे. तसेच दाहक व स्फोटक पदार्थ, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे जवळ बाळगणे, जमा करणे अथवा तयार करणे, व्यक्तींच्या किंवा प्रतिमांच्या प्रदर्शनासह प्रक्षोभक घोषणा, गाणी, भाषणे, हावभाव तसेच शांतता व सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणाऱ्या कृती करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. जिल्ह्यात पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमण्यासही मनाई करण्यात आली आहे.

कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांची विशेष परवानगी असलेल्या मिरवणुकांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे. सभा, मिरवणुका, मोर्चे काढणे, पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमणे आणि ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किंवा पोलीस अधीक्षकांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक राहणार आहे. नागरिकांनी आदेशाचे पालन करून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

माळकौठ्यातील पीडित कुटुंबाला रोहित पवारांचा आधार

मुलीच्या उच्च शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली; खासगी फायनान्स कंपन्यांच्या कारभाराच्या एसआयटी चौकशीसाठी प्रयत्न करणार



मुदखेड (प्रतिनिधी)– माळकौठा येथील दुर्दैवी घटनेत स्व. चंद्रकांत शिंदे यांच्या निधनामुळे संकटात सापडलेल्या कुटुंबियांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी केवळ सांत्वन करून न थांबता पीडित कुटुंबाच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मदतीची घोषणा केली. शिंदे यांच्या मुलीच्या पुढील उच्च शिक्षणापर्यंतची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याचे आश्वासन देत कुटुंबाला मोठा आधार दिला.

यावेळी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील, आमदार सुनील भुसारा, जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, युवक जिल्हाध्यक्ष धनंजय सूर्यवंशी, शेतकरी संघटनेचे हनमंत पाटील राजेगोरे, पप्पू पाटील कोंढेकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवानंद पाटील शिप्परकर, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शेतकरी संघटनेचे संतोष गव्हाणे, संदीप देशमुख, आशिष कल्याणे, तेजस जाधव, पप्पू पाटील जाधव, प्रशांत मुंगल व गावकऱ्यांची उपस्थिती होती.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर खासगी फायनान्स कंपन्यांकडून होणारी कथित आर्थिक पिळवणूक, कर्जवसुलीच्या पद्धती आणि सर्वसामान्य नागरिकांवर येणारा मानसिक ताण हे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. या प्रकरणात संबंधित फायनान्स कंपनीच्या व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन व्हावे, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

स्व. चंद्रकांत शिंदे यांच्या पत्नीची इच्छा असल्यास त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. त्यामुळे कुटुंबाच्या आर्थिक पुनर्वसनासाठीही मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे.

माळकौठा येथील घटना ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका म्हणून पाहून चालणार नाही. खासगी फायनान्स कंपन्या, अनधिकृत सावकारी आणि कर्जवसुलीच्या नावाखाली होणाऱ्या कथित मानसिक छळाच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी प्रभावी कायदेशीर नियंत्रण, तक्रार निवारण यंत्रणा आणि दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचेही आ. रोहित पवार यांनी म्हटले.

धरणे आंदोलनाच्या ठिकाणीच क्रांतिकारकांचा जागर; राघोजी भांगरेंची २२१ वी जयंती साजरी



नांदेड (प्रतिनिधी)– आद्य क्रांतिकारक राघोजी भांग्रे यांची २२१ वी जयंती आदिवासी कोळी महादेव समाजाच्या वतीने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातील बेमुदत धरणे आंदोलन स्थळी साजरी करण्यात आली. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी धरणे आंदोलन स्थळी भेट देऊन अभिवादन केले.

यावेळी ॲड. परमेश्वर गोणारे, भीमराव पुंजरवाड, सिद्धेश्वर पिटलेवाड, केरबा जेठेवाड, राजू गादगे, ज्ञानेश्वर मरकंटे, माधवराव रेडेवाड, डॉ. मेकेवाड, डॉ. आदमपूरकर, विश्वनाथ चंदलवाड, लक्ष्मण दोंतुलवाड, महिपती दोंतुलवाड, पेंडलवाड, संजय निलेवाड, हनमंत करेवाड, लक्ष्मण घोरपडे, विठ्ठलराव पंजेवाड, शंकर रोडेवाड, साईनाथ यमूलवाड, माधव बोईनवाड, लक्ष्मण मद्देवाड, राजू मद्देवाड, तुकाराम बोलेवाड, एस. बी. घोरपडे, ॲड. चंद्रकला जेठेवाड, बाबुराव यमलवाड, अंकिताबाई मोरे, भारती झुडपे, शोभा मोकळे, लक्ष्मीबाई घोरपडे, दैवशाला सोळंके, सावित्राबाई मुंजबळे, सोनाबाई पुठ्ठेवाड, चांदराव पिल्लेवाड, आनंदा जंगेपल्लेवाड, व्यंकटराव दावेवार, मारुती कोठेवाड यांच्यासह आदिवासी कोळी महादेव समाजाच्या महिला आणि पुरुषांची पस्थिती होती.

अंतर्मन

घरातील मनी प्लांट वारंवार सुकतोय?

काय आहेत संकेत? जाणून घ्या योग्य दिशा अन् सोपे उपाय...



घरात लावलेला मनी प्लांट वारंवार सुकत असेल, तर त्यामागे नेमके काय कारण असू शकते? वास्तुशास्त्रानुसार याचा संबंध घरातील सकारात्मक ऊर्जा आणि आर्थिक समृद्धीशी जोडला जातो. मात्र, चुकीची जागा, अपुरा प्रकाश किंवा पाण्याचे अयोग्य प्रमाण यामुळेही रोप सुकू शकते. जाणून घेऊया मनी प्लांट सुकण्यामागील कारणे, तो ठेवण्याची योग्य दिशा आणि त्यासाठीचे सोपे उपाय...

घरातील वातावरण प्रसन्न आणि हिरवेगार ठेवण्यासाठी अनेक जण मनी प्लांट लावतात. वास्तुशास्त्रानुसार या रोपाला सुख-समृद्धी, आर्थिक भरभराट आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक मानले जाते. मात्र, घरात लावलेला मनी प्लांट वारंवार सुकत असेल किंवा त्याची पाने पिवळी पडत असतील, तर अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो. वास्तुशास्त्रात यामागे काही विशिष्ट संकेत सांगितले आहेत. वास्तुतज्ज्ञांच्या मते, रोपाची योग्य काळजी न घेण्याबरोबरच ते ठेवण्याची चुकीची जागाही त्याच्या वाढीवर परिणाम करू शकते. त्यामुळे मनी प्लांट सुकण्याची कारणे, तो ठेवण्याची योग्य दिशा आणि त्यासंबंधीचे उपाय जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

मनी प्लांट सुकण्यामागील कारणे...

» नकारात्मक ऊर्जेचा प्रभाव : वास्तुशास्त्रानुसार मनी प्लांट घरातील नकारात्मक ऊर्जा शोषून घेण्यास मदत करतो, अशी मान्यता आहे. घरातील वातावरणात नकारात्मकता वाढल्यास या रोपावर त्याचा परिणाम होऊन ते सुकू शकते, असे वास्तुशास्त्रात सांगितले जाते. मात्र, याला वैज्ञानिक आधार नाही.

» शुक्र ग्रहाशी संबंधित मान्यता : ज्योतिषशास्त्र आणि वास्तुशास्त्रात मनी प्लांटचा संबंध शुक्र ग्रहाशी जोडला जातो. शुक्र ग्रह हा सुख, ऐश्वर्य, वैभव आणि भौतिक सुखसोयींचा कारक मानला जातो. त्यामुळे मनी प्लांटची वाढ खुंटणे किंवा तो वारंवार सुकणे हे घरातील सुख-समृद्धीच्या ऊर्जेत अडथळे निर्माण होण्याचे संकेत असल्याची मान्यता आहे.

» अचानक खर्च वाढण्याचे संकेत : मनी प्लांटला नवीन पाने फुटल्यानंतर ती लगेच पिवळी पडू लागली, तर वास्तुशास्त्रीय मान्यतेनुसार आगामी काळात अनपेक्षित खर्च वाढण्याची शक्यता दर्शवणारे लक्षण मानले जाते. याचा संबंध घराच्या आर्थिक नियोजनातील अस्थिरतेशीही जोडला जातो.

मनी प्लांट ठेवण्याची जागाही महत्त्वाची...

मनी प्लांट वारंवार सुकण्यामागे केवळ वास्तुदोषच कारणीभूत असतो असे नाही. अनेकदा रोपाच्या नैसर्गिक वाढीसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची कमतरता हे त्यामागील प्रमुख कारण असते. रोप थेट वातानुकूलित यंत्राच्या थंड हवेच्या प्रवाहासमोर ठेवल्यास त्याच्या वाढीवर परिणाम होऊ शकतो. पुरेसा अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश आणि हवा न मिळाल्यासही पाने पिवळी पडू शकतात. तसेच, कुंडीत सतत पाणी साचून राहिल्यास मुळांना कुजण्याचा धोका असतो. त्यामुळे मनी प्लांट ठेवताना योग्य जागा निवडणे आणि त्याची नियमित काळजी घेणे आवश्यक आहे.

मनी प्लांट ठेवण्याची योग्य दिशा आणि पद्धत

» उत्तर किंवा ईशान्य दिशा : वास्तुशास्त्रानुसार घराच्या उत्तर किंवा ईशान्य दिशेला मनी प्लांट ठेवणे शुभ मानले जाते. या दिशेला रोप लावताना मातीऐवजी पाण्यात त्याची वाढ करावी, अशी वास्तुशास्त्रीय सूचना आहे. शक्य असल्यास निळ्या रंगाच्या काचेच्या बाटलीत हे रोप ठेवावे. या दिशेला मनी प्लांट ठेवल्याने उत्पन्नाचे नवे मार्ग खुले होतात, अशी मान्यता आहे.

» पूर्व ते आग्नेय दिशा : घराच्या पूर्वेकडून आग्नेय दिशेपर्यंतच्या भागात मनी प्लांट ठेवण्यासाठी मातीची कुंडी वापरणे योग्य मानले जाते. वास्तुतज्ज्ञांच्या मते, या दिशेला मातीच्या कुंडीत लावलेले रोप स्थिरता आणि आर्थिक बचतीसाठी अनुकूल मानले जाते. त्यामुळे आर्थिक स्थिती मजबूत होण्यास मदत होते, अशी वास्तुशास्त्रीय धारणा आहे.

» वेली जमिनीवर पसरू देऊ नका : मनी प्लांटची वेल जमिनीवर पसरू देण्याऐवजी तिला दोरी, काठी किंवा आधाराच्या साहाय्याने वरच्या दिशेने वाढवावे. वेल वरच्या दिशेने वाढणे हे प्रगती आणि भरभराटीचे प्रतीक मानले जाते.

मनी प्लांट सुकल्यास कोणते उपाय करावेत?



» सुकलेली पाने आणि वेल काढून टाका : रोपाची पाने पिवळी किंवा पूर्णपणे सुकलेली असल्यास ती स्वच्छ कात्रीने काढून टाकावीत. एखादी फांदी किंवा वेल पूर्णपणे सुकली असल्यास तीही छाटावी. पाने किंवा वेल हाताने जोरात ओढून तोडू नयेत.

» दूध आणि पाण्याचा उपाय : वास्तुशास्त्रीय मान्यतेनुसार शुक्रवारी पाण्यात थोडे कच्चे दूध मिसळून ते रोपाच्या मुळाशी अर्पण करण्याचा उपाय सांगितला जातो. यामुळे घरातील सकारात्मकता वाढते, अशी श्रद्धा आहे. मात्र, रोपाच्या मुळाशी दूध घातल्याने बुरशी किंवा इतर समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्यक्ष रोपाच्या आरोग्यासाठी दूध न घालणेच योग्य.

» लाल धागा बांधा : शुक्रवारी मनी प्लांटच्या फांदीला किंवा कुंडीला लाल कलावा बांधण्याचा उपाय वास्तुशास्त्रात सांगितला जातो. यामुळे घरातील आर्थिक स्थैर्य टिकून राहण्यास मदत होते, अशी धार्मिक मान्यता आहे.

» सूर्यप्रकाश आणि पाण्याचा समतोल राखा : मनी प्लांटला कडक उन्हात ठेवू नये. त्याऐवजी पुरेसा अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश मिळेल अशा ठिकाणी ठेवावे. कुंडीतील मातीचा वरचा थर कोरडा झाल्यानंतरच पाणी द्यावे. जास्त पाणी दिल्यास मुळे कुजण्याची शक्यता असते. कुंडीला पाण्याचा निचरा होण्यासाठी छिद्र असणेही आवश्यक आहे.

भीमाचा नातू बर्बरीक ते खाटू श्याम बाबा!

तीन दिव्य बाणांनी महाभारताचे युद्ध संपवण्याची होती ताकद; श्रीकृष्णांनी डोंगरावर का ठेवले होते त्यांचे छिन्नमस्तक?

महाभारतातील पराक्रमी योद्धा बर्बरीक आणि खाटू श्याम बाबा यांचे नेमके नाते काय? भगवान श्रीकृष्णांनी बर्बरीक यांच्याकडे त्यांच्या मस्तकाचे दान का मागितले? तसेच त्यांचे छिन्नमस्तक एका उंच डोंगरावर का ठेवण्यात आले? जाणून घेऊया या पौराणिक कथेमागील रंजक आख्यायिका...

महाभारताच्या युद्धात पांडव आणि कौरवांच्या बाजूने अनेक पराक्रमी योद्धे लढत होते. मात्र, या युद्धात एक असा महाबली योद्धा होता, ज्याच्याकडे केवळ तीन दिव्य बाणांच्या साहाय्याने संपूर्ण युद्धाचा निकाल बदलण्याची ताकद होती. हा योद्धा म्हणजे भीमाचा नातू आणि घटोत्कचाचा पुत्र बर्बरीक. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष युद्धात सहभागी होण्यापूर्वीच भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्याकडे मस्तकाचे दान मागितले. बर्बरीक यांनीही आपले मस्तक श्रीकृष्णांच्या चरणी अर्पण केले. याच बर्बरीक यांची पुढे खाटू श्याम बाबा म्हणून पूजा होऊ लागली, अशी पौराणिक मान्यता आहे.



महाबलिदान... श्रीकृष्णांनी मागितले मस्तकाचे दान

बर्बरीक यांची परीक्षा घेण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी ब्राह्मणाचे रूप धारण केले आणि त्यांच्याकडे दान मागितले. दान देण्याची तयारी दर्शवल्यानंतर ब्राह्मणाने बर्बरीक यांच्याकडे त्यांचे मस्तक मागितले. समोर आलेली व्यक्ती सामान्य ब्राह्मण नसून प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण आहेत, हे बर्बरीक यांनी ओळखले. त्यांनी श्रीकृष्णांकडे एक अंतिम इच्छा व्यक्त केली. महाभारताचे संपूर्ण युद्ध स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याची त्यांची इच्छा होती. श्रीकृष्णांनी त्यांची इच्छा मान्य केली. त्यानंतर बर्बरीक यांनी स्वतःचे मस्तक अर्पण केले. श्रीकृष्णांनी त्यांचे छिन्नमस्तक युद्धभूमीजवळील एका उंच डोंगरावर स्थापित केले. तेथून बर्बरीक यांनी संपूर्ण महाभारताचे युद्ध पाहिले, अशी पौराणिक आख्यायिका आहे.

बर्बरीक यांचे खाटू श्याम बाबा म्हणून पूजन कसे सुरू झाले?



बर्बरीक यांच्या अतुलनीय त्यागावर आणि भक्तीवर प्रसन्न होऊन भगवान श्रीकृष्णांनी त्यांना वरदान दिले. कलियुगात तुमची माझ्याच श्याम नावाने पूजा केली जाईल. जो कोणी पराभूत, दुःखी किंवा निराधार मनुष्य तुमच्या आश्रयाला येईल, त्याला तुम्ही आधार द्याल, असा वर श्रीकृष्णांनी दिल्याचे मानले जाते. याच वरदानामुळे बर्बरीक यांना खाटू श्याम या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांना 'हारे का सहारा' म्हणजेच पराभूत आणि निराश झालेल्यांचा आधार असेही संबोधले जाते.

कोण होते बर्बरीक?

बर्बरीक हे महाबली भीमाचे नातू आणि घटोत्कचाचे पुत्र होते. बालपणापासूनच त्यांना युद्धकलेची आवड होती. त्यांनी आपली माता अहिलावती यांच्याकडून युद्धकलेचे शिक्षण घेतले होते. कठोर तपश्चर्येमुळे भगवान शिव त्यांच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी बर्बरीक यांना तीन अमोघ दिव्य बाण प्रदान केले, अशी पौराणिक कथा सांगितली जाते. या तीन बाणांची शक्ती विलक्षण होती. पहिल्या बाणाने युद्धभूमीवरील लक्ष्य निश्चित करता येत असे, दुसऱ्या बाणाने नष्ट करावयाच्या लक्ष्यांची ओळख पटवता येत असे, तर तिसऱ्या बाणाने निश्चित केलेली सर्व लक्ष्ये भेदली जात असत, अशी या बाणांविषयी आख्यायिका आहे. त्यामुळे बर्बरीक यांच्याकडे संपूर्ण सैन्याचा पराभव करण्याचे सामर्थ्य होते. बर्बरीक यांनी आपल्या मातेला एक वचन दिले होते. महाभारताच्या युद्धात ते नेहमी पराभवाच्या दिशेने जाणाऱ्या किंवा दुर्बल बाजूने लढतील, असे हे वचन होते.

श्रीकृष्णांनी बर्बरीक यांना युद्धापासून का रोखले?

महाभारताचे युद्ध सुरू होण्यापूर्वी बर्बरीक यांनीही युद्धात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यांची तीन दिव्य बाणांची शक्ती आणि मातेला दिलेले वचन याची भगवान श्रीकृष्णांना पूर्ण जाणीव होती. बर्बरीक यांनी कौरवांच्या बाजूने युद्ध सुरू केले असते आणि त्यामुळे पांडवांची बाजू कमजोर झाली असती, तर आपल्या वचनानुसार ते पांडवांच्या बाजूने लढू लागले असते. त्यानंतर कौरवांची बाजू दुर्बल झाली असती, तर ते पुन्हा कौरवांच्या बाजूने गेले असते. अशा प्रकारे दोन्ही बाजूंचे सैन्य नष्ट होईपर्यंत त्यांची भूमिका बदलत राहिली असती. अखेरीस युद्धभूमीवर केवळ बर्बरीकच उरले असते, अशी श्रीकृष्णांची धारणा होती. त्यामुळे महाभारताच्या युद्धाचा मूळ उद्देश आणि धर्मस्थापनेची प्रक्रिया बाधित होऊ नये, यासाठी श्रीकृष्णांनी बर्बरीक यांना युद्धात सहभागी होण्यापासून रोखण्याचा निर्णय घेतला.

राजस्थानातील खाटू गावात कसे प्रकट झाले मस्तक?

लोकमान्यतेनुसार, राजस्थानमधील सीकर जिल्ह्यातील खाटू गावात एका गायीचे दूध दररोज एका विशिष्ट ठिकाणी आपोआप जमिनीवर पडत असे. हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्या जागेची खोदाई करण्यात आली. त्यावेळी जमिनीखाली बर्बरीक यांचे दिव्य मस्तक आढळून आले, अशी आख्यायिका आहे. त्यानंतर तत्कालीन राजा रूपसिंह चौहान यांनी या ठिकाणी भव्य मंदिर उभारले. पुढे हे मंदिर खाटू श्याम मंदिर म्हणून प्रसिद्ध झाले. आज देशभरातून लाखो भाविक या मंदिरात दर्शनासाठी येतात. बर्बरीक यांच्या त्यागाची ही कथा भक्ती, वचनपालन आणि समर्पणाचे प्रतीक मानली जाते. त्यामुळेच खाटू श्याम बाबांना आजही लाखो भाविक श्रद्धेने हारे का सहारा म्हणून पूजतात.

कोणताही अपराध केला नसताना शिक्षा का भोगावी लागते? निरपराध व्यक्तीवर खोटा आळ का येतो?



आयुष्यात अनेकदा कोणतीही चूक केलेली नसतानाही माणसाला अपमान, आरोप आणि दुःखाचा सामना करावा लागतो. अशा वेळी त्याच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो, माझ्याच वाट्याला हा अन्याय का? प्रत्येक घटनेमागे केवळ वर्तमानातील परिस्थितीच कारणीभूत असते असे नाही, तर काही घटनांचा संबंध पूर्वकर्मांशीही जोडला जातो, अशी धार्मिक आणि आध्यात्मिक मान्यता आहे. आपण कोणताही अपराध केलेला नसताना आपल्यावर खोटा आरोप झाला असेल आणि त्यामुळे मन अस्वस्थ असेल, तर ही कथा एकदा अवश्य वाचा...

एकदा एका भक्ताने महाराजांना कुतूहलाने विचारले, 'महाराजजी! मी कोणतीही चोरी केलेली नाही. तरीही माझ्यावर चोरी केल्याचा खोटा आरोप करण्यात आला आणि माझ्यावर कलंक लागला. माझ्याच बाबतीत असे का घडले?' महाराजांनी शांतपणे उत्तर दिले, 'वत्सा! ईश्वराच्या व्यवस्थेत कधीही अन्याय होत नाही. माणसाला अनेकदा त्याच्या पूर्वीच्या कर्मांचे फळ अशा वेळी मिळते, जेव्हा वर्तमानातील परिस्थितीत त्यामागचे कोणतेही स्पष्ट कारण दिसत नाही. कदाचित भूतकाळात तुझ्याकडून एखादी चूक घडली असेल आणि त्या वेळी तिचे फळ तुला मिळाले नसेल. आज त्याच कर्माचा हिशेब एखाद्या छोट्याशा दुःखाच्या रूपाने पूर्ण झाला असेल.'

कठीण काळातही चांगले कर्म सोडू नका!

आयुष्यातील प्रत्येक परिस्थितीचा विचार केवळ वर्तमानातील घटनांच्या आधारे करता येत नाही. त्यामुळे माणसाने आपले आचरण शुद्ध ठेवावे, नेहमी सत्याची साथ द्यावी आणि प्रतिकूल परिस्थितीतही संयम व धैर्य सोडू नये. कर्मसिद्धांत समजून घेण्याचा प्रयत्न करताना आपल्या वर्तमानातील कृती अधिक चांगल्या कशा होतील, याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांमागे प्रारब्धाचाही प्रभाव असतो, अशी ज्योतिषशास्त्रीय मान्यता आहे. जन्मपत्रिकेतील ग्रह-नक्षत्रांच्या स्थितीवरून प्रारब्ध आणि संभाव्य घटनांचे आकलन करता येते, असे ज्योतिषशास्त्रात सांगितले जाते.

महाराज म्हणाले, की 'आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा संबंध केवळ आपल्या वर्तमानातील कर्मांशी असतोच असे नाही. काही वेळा पूर्वीच्या कर्मांचा हिशेबही समोर येतो. म्हणूनच कधी यज्ञ- हवन करत असतानाही माणसाचा हात भाजतो, तर कधी चोरी करणाऱ्या व्यक्तीला लगेच सुख आणि लाभ मिळताना दिसतो. याचा अर्थ चांगल्या कर्मांचे फळ मिळत नाही किंवा वाईट कर्मांचे परिणाम भोगावे लागत नाहीत, असा अजिबात नाही. कर्मांचे फळ नेमके कधी, कोणत्या स्वरूपात आणि कोणत्या वेळी मिळेल, हे समजणे माणसासाठी कठीण आहे. अनेकदा वर्तमानात घडणाऱ्या एखाद्या घटनेमागे भूतकाळातील असा काही हिशेब असतो, ज्याची आपल्याला कल्पनाही नसते.'

अंधार कितीही मोठा असला, तरी प्रकाशाची किरण पुरेशी!

अंधार कितीही गडद आणि विस्तीर्ण असला, तरी त्याला दूर करण्यासाठी प्रकाशाची एक छोटीशी किरणही पुरेशी ठरते. जीवनातही हाच नियम लागू होतो. निराशा आणि नकारात्मक विचारांनी मन व्यापलेले असतानाही विवेक, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारांची छोटीशी सुरुवात मोठ्या परिवर्तनाला कारणीभूत ठरू शकते. ध्यानधारणा, साधना, प्रार्थना, सत्संग आणि स्वाध्याय यांसारख्या गोष्टी मनाला शांतता आणि आत्मचिंतनाची दिशा देऊ शकतात. ज्योतिषीय उपायांनाही काही जण श्रद्धेचा भाग म्हणून महत्त्व देतात. या सर्वांचा मुख्य उद्देश केवळ बाह्य परिस्थिती बदलणे नसून स्वतःचे विचार, भावना आणि वर्तन अधिक शुद्ध व संतुलित बनवणे हा असावा.

ग्रहदोषांबरोबर स्वतःमधील दोषही ओळखा!

ग्रहांची स्थिती समजून घेणे जितके महत्त्वाचे मानले जाते, तितकेच स्वतःमधील उणिवा ओळखणेही आवश्यक आहे. एखादी व्यक्ती ज्योतिषीय उपाय करत असेल; मात्र तिच्या स्वभावात राग, अहंकार, आळस, मत्सर आणि नकारात्मक विचार कायम असतील, तर अपेक्षित बदल घडवून आणणे कठीण होऊ शकते. त्यामुळे धार्मिक किंवा ज्योतिषीय उपायांसोबत विचार आणि वर्तनात सुधारणा करणेही गरजेचे आहे. स्वतःच्या कृती सुधारण्याचा निर्धारही असला पाहिजे.

तात्पर्य : आपल्या हातात प्रत्येक घटनेवर नियंत्रण ठेवणे नसले, तरी आपले कर्म, आचरण आणि विचार शुद्ध ठेवणे निश्चितच आपल्या हातात आहे. अन्याय झाला म्हणून सत्याची साथ सोडू नका आणि संकट आले म्हणून चांगले कर्म करणे थांबवू नका. कारण परिस्थिती बदलू शकते; मात्र आपल्या चांगल्या कर्मांची दिशा आपणच ठरवू शकतो.

मुंबईत अग्नीतांडव सुरुच! पाच दिवसांत ३३३ आगींच्या घटना; फटाक्यांवरील बंदी फक्त कागदावरच?



मुंबई (प्रतिनिधी)– दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फोडण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे मुंबईत अग्नीतांडव सुरुच असल्याचे चित्र सध्या बघायला मिळत आहे. अशातच ६ ते १० नोव्हेंबरदरम्यान मुंबईत आगीच्या तब्बल ४९९ घटनांची नोंद करण्यात आली आहे. यापैकी तब्बल ३३३ आगीच्या घटना फटाक्यांमुळे झाल्याचे निष्पन्न झालं आहे. तर ५ दिवसांत फटाक्यांमुळे दोन मृत्यू आणि आठ जण जखमी झाल्याची माहिती आहे. दरम्यान, ९ नोव्हेंबरला सर्वाधिक म्हणजेच १६६ आगीच्या घटना घडल्या असून त्यापैकी १४४ या आगी फटाक्यांमुळे लागल्या आहेत.

दरम्यान, १० नोव्हेंबरला १०२ आगीच्या घटना घडल्या असून त्यातील २४ आगी या फटाक्यांमुळे लागल्याची माहिती आहे. यासह ८ नोव्हेंबरला १४२ आगीच्या घटना घडल्या असून त्यापैकी १३७ या फटाक्यांमुळे लागल्या आहेत. गोरेगाव ते दहिसरदरम्यानच्या पश्चिम उपनगरातील झोन-४ मध्ये ४८ तासांत ९६ आगीच्या घटनांची नोंद करण्यात आली आहे. झोन-४ मध्ये एकाचा मृत्यू, तर दोघे जखमी झाले आहे.

तर तिकडे, मालाड-मालवणी येथे फटाक्यांच्या स्फोटामुळे दुकानाच्या स्लॅबचा भाग कोसळून १६ वर्षीय शहानवाज नियाज खानचा मृत्यू झाला आहे. महत्वाची बाब म्हणजे ९ नोव्हेंबरपासून रॉकेट आणि आकाशात उडणाऱ्या फटाक्यांवर बंदी असतानाही सर्रास आतषबाजी सुरु असल्याचे चित्र बघायला मिळत आहे. त्यामुळे मुंबईत फटाक्यांवरील बंदी फक्त कागदावरच? असा प्रश्न या निमित्याने विचारला जात आहे.

दरम्यान, रात्रीच्या वेळी कारवाईसाठी पथके तैनात करण्यात अडचणी येत असल्याची पालिका अधिकाऱ्यांकडून कबुली देण्यात आली आहे. परिणामी फटाक्यांवरील बंदीच्या अंमलबजावणीवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मुंबई शहरात दिवाळीमध्ये फटाके फोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. रॉकेट आणि आकाशात उडणारे फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणात आगीचे घटनेमध्ये वाढ झाली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिके कडून ९ नोव्हेंबर पासून तर २५ नोव्हेंबर पर्यंत मुंबई शहरात रॉकेट आणि आकाशात उडणारे फटाक्यांना बंदी घालण्यात आली आहे.

मला १०० टक्के खात्री, विलिनीकरणाचा विषय होणार नाही

सतेज पाटील यांचं दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर रोखठोक मत...



मुंबई (प्रतिनिधी)– काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणासंदर्भात बोलताना १०० टक्के विलिनीकरणाचा विषय होणार नसल्याची खात्री असल्याचं म्हटलं. अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष यांच्या विलिनीकरणाच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून घडत आहेत. या पार्श्वभूमीवर सतेज पाटील यांना एबीपी माझाच्या कॉफी विथ कौशिक या कार्यक्रमात याबाबत विचारण्यात आलं होतं. यावर त्यांनी भूमिका स्पष्ट केली आहे.

सतेज पाटील म्हणाले की, मला विलिनीकरणाचा प्रश्न गेल्या काही दिवसांमध्ये १० वेळा विचारला गेला. कदाचित अजितदादा असताना काही चर्चा झाल्या असतील.परंतु आता मला अजिबात वाटत नाही विलिनीकरण वगैरे होईल, असं सतेज पाटील यांनी म्हटलं. सरकारमधील तिन्ही पक्षातील वादातून अस्थिरता निर्माण केल्याशिवाय भाजपला फायदा होत नाही. दोन्ही पक्षांना म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदे गट हे कसे खिळखिळे होतील हा प्रयत्न भाजपचा आहे. त्यामुळं मला १०० टक्के खात्री आहे की आदरणीय पवारसाहेब आणि हा विलिनीकरणाचा विषय होणार नाही, असं सतेज पाटील यांनी म्हटलं.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी देखील आज विलिनीकरणावर भूमिका स्पष्ट केली आहे. सोशल मीडियावर एक पोस्ट करत रोहित पवार यांनी म्हटलं की, विलीनीकरणाची चर्चा तर नाहीच आणि भाजपा सोबत असताना विलिनीकरणाचा तर विषय सुद्धा येत नाही. त्यामुळं आमच्याशिवाय दोन्ही राष्ट्रवादीचं एकत्रीकरण होणार नाही, हे मुख्यमंत्र्यांनी केलेलं वक्तव्य म्हणजे सत्तेचा अहंकार आहे..

झउचउ निवडणुकीत मुंढवा प्रकरणी ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करूनही अजितदादांनी भाजपला कणभर देखील भीक घातली नव्हती. दादांना ब्लॅकमेल कोण करत होतं किंवा ब्लॅकमेल करण्याचे आदेश कुणाचे होते? त्यामुळे ब्लॅकमेलिंगच्या पायावर ज्यांचं राजकारण उभं आहे, अशा भाजपने आणि त्यांच्या नेत्यांनी राष्ट्रवादीच्या एकत्रकरण्याच्या विषयात न बोललेलंच बरं..!, असं रोहित पवार यांनी म्हटलं.

सिंहगड शिक्षण संस्थेला हायकोर्टाचा दणका

४४ संस्थांची सीबीआय, ईडी व आयकर विभागाकडून चौकशीचे आदेश



मुंबई (प्रतिनिधी)– शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तब्बल ८ वर्षांपासून वेतन आणि निवृत्तीवेतनाचे लाभ थकवून त्यांना आर्थिक संकटात ढकलणाऱ्या 'सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी'च्या कारभारावर मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी कठोर ताशेरे ओढले. संस्थेच्या ४४ शैक्षणिक संस्थांतील आर्थिक व्यवहार, विश्वस्तांची मालमत्ता आणि निधीच्या कथित गैरवापराची केंद्रीय अन्वेषण विभाग, सक्तवसुली संचालनालय आणि आयकर विभागामार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यासोबतच ट्रस्टची सर्व बँक खाती आणि गुंतवणूक गोठवण्याचे निर्देश देत विश्वस्तांच्या मालमत्ता व्यवहारांवरही बंदी घालण्यात आली आहे.

कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ६० कोटी रुपये देण्याचे आश्वासन देऊनही ते न पाळल्याने उच्च न्यायालयाने संस्थेच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. काही कर्मचाऱ्यांचे ८ वर्षांपासून वेतन थकीत असून, या आर्थिक विवंचनेतून १२ हून अधिक कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या गंभीर बाबीचाही न्यायालयाने आपल्या आदेशात उल्लेख केला आहे. तसेच, न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त मारुती नवले यांच्यासह अन्य विश्वस्तांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या कारवाईमुळे संस्थेच्या १३ शाळांची मान्यता रद्द करण्याचा आणि तांत्रिक शिक्षण संस्थांवर प्रशासक नेमण्याचा मार्गही मोकळा झाला आहे.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने संस्थेच्या कारभारावर अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित केले. संस्थेच्या ४४ शैक्षणिक संस्था पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत आणि आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शासकीय अनुदानित शुल्काचा अपवाद वगळता इतर विद्यार्थ्यांकडून नियमित शुल्कही घेतले जात आहे. असे असताना तब्बल ८ वर्षे कर्मचाऱ्यांचे वेतन देणे संस्थेला कसे शक्य झाले नाही? असा थेट सवाल न्यायालयाने केला.

कर्मचाऱ्यांना देय असलेली वेतनाची रक्कम अन्य व्यवसायांकडे वळवली जात असल्याची ठोस शक्यता न्यायालयाने वर्तवली आहे. या प्रकरणात 'मनी लाँडरिंग'चा (आर्थिक गैरव्यवहार) प्रकार घडला आहे का, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. इतकंच नव्हे तर, हा निधी देशाबाहेर वळवला गेला असण्याची शक्यताही न्यायालयाने नाकारलेली नाही.

आमदार परिणय फुकेंच्या मुलाने दारुच्या नशेत अनेकांना चिरडलं, एकाचा मृत्यू, हर्षवर्धन सपकाळांचा गंभीर आरोप



भोपाळ (वृत्तसंस्था)– मध्य प्रदेश-महाराष्ट्र सीमेवरील नागपूरजवळच्या पेंच अभयारण्य परिसरात झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. अपघातग्रस्त गाडी भाजप आमदार परिणय फुके यांच्या मालकीची आणि अपघातावेळी त्यांचा मुलगा मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी सोशल मिडीयावरती पोस्ट शेअर करत अपघाताचे फोटो आणि कारची सर्व माहिती शेअर केली आहे. पुढे पोस्टमध्ये सपकाळ यांनी म्हटलंय की, एका तरुणाचा जीव गेला आहे, त्यामुळे हे प्रकरण दडपण्याचा किंवा राजकीय दबावातून दोषींना वाचवण्याचा प्रयत्न अजिबात खपवून घेतला जाणार नाही. आमदाराचा मुलगा म्हणून कायद्यापासून संरक्षण मिळणार नाही, हे मुख्यमंत्र्यांनी दाखवून द्यावे. निष्पक्ष चौकशी आणि कठोर कारवाई झालीच पाहिजे!

मध्य प्रदेश-महाराष्ट्र सीमेवरील नागपूरजवळच्या पेंच अभयारण्य परिसरात झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. अपघातग्रस्त गाडी भाजप आमदार परिणय फुके यांच्या मालकीची आणि अपघातावेळी त्यांचा मुलगा मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत असल्याचे समोर आले आहे. एका तरुणाचा जीव गेला आहे, त्यामुळे हे प्रकरण दडपण्याचा किंवा राजकीय दबावातून दोषींना वाचवण्याचा प्रयत्न अजिबात खपवून घेतला जाणार नाही. आमदाराचा मुलगा म्हणून कायद्यापासून संरक्षण मिळणार नाही, हे मुख्यमंत्र्यांनी दाखवून द्यावे. निष्पक्ष चौकशी आणि कठोर कारवाई झालीच पाहिजे!

त्याचबरोबर शिवसेना ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी देखील यासंबंधीची पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे, त्यांनी म्हटलंय की, एकीकडे महाराष्ट्रातला शेतकरी दुष्काळात होरपळून जात आहे आणि दुसरीकडे महाराष्ट्रातल्या आमदारांची पोरं मात्र भरधाव वेगाने गाड्या फिरवत आहेत, कुणाचा जीव गेला तरी यांना कुठे फरक पडतो? चार दिवसांपूर्वी पेंच अभयारण्य मध्यप्रदेशकडून नागपूरला येताना या गाडीचा एक्सीडेंट झाला. भरधाव वेगाने पाच मुले पाच मुली दारूच्या नशेत गाडी चालवत असताना हा एक्सीडेंट झाला.दिशांत अली या तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर पाच जणांची प्रकृती अति गंभीर आहे. मध्य प्रदेशच्या सिवनी जिल्ह्यातील कुरई पोलीस स्टेशन येथे एम एल सी नोंद झाली.

सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण



नवी दिल्ली (प्रतिनिधी)– सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण कायम आहे. २४ कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर आता १ लाख ४० हजारांच्या खाली पोहोचला आहे. तर दुसरीकडे चांदीच्या दरात देखील घसरण झाली आहे. चांदीच्या दरात आज ३९०१ रुपयांची घसरण झालीय. एकीकडे सोने आणि चांदीच्या दरात घसरण कायम असली तरी डिसेंबर महिन्यात सोन्याचे दर पुन्हा दीड लाख रुपयांचा टप्पा गाठतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

क्रूड ऑईलच्या दरात घसरण झाली असली तरी अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या कठोर भूमिकमुळं सोन्याच्या दरांवर नकारात्मक परिणाम झाल्याचं पाहायला मिळतंय. अमेरिकन फेड रिझर्व्हकडून व्याज दरात वाढ केली जाण्याची शक्यता असल्यानं अमेरिकन डॉलर मजबूत होण्याची शक्यता असल्यानं सोन्याच्या दरांमध्ये घसरण झाली आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर २४ कॅरेट सोन्याचा दर १३८५०० रुपये प्रति तोळा आहे. तर, आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा दर ३९५५ डॉलर प्रति औंसवर आहे.

इंडिया बुलियन ज्वेलर्स असोसिएशनकडून जारी करण्यात रुपयांची घसरण झाली. २२ कॅरेट सोन्याच्या दरात देखील घसरण झाली आहे. २२ कॅरेट सोन्याचा उपयोग दागिने तयार करण्यासाठी केला जातो. या सोन्याचा दर १२८७९२ रुपयांवरुन कमी होत १२६६७७ रुपयांवर आला आहे. म्हणजेच आज २२ कॅरेट सोनं २११५ रुपयांनी स्वस्त झालं आहे.

सोन्याप्रमाणं चांदीच्या दरात देखील घसरण कायम आहे. चांदीच्या दरात काल वाढ झाली होती मात्र आज घसरण झाली आहे. एक किलो चांदीचा दर १८५९०० रुपयांवरुन १८१९९९ रुपये किलोवर आला आहे.

टी.सी. हरवली

माझी डहाळे आशिष रमेश या नावाची दहावी पासची टी. सी. हडको ते जुना मोंढा ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

संपर्क मोबाईल
डहाळे आशिष रमेश
रा. सिडको नांदेड

भारताचा ऐतिहासिक सुवर्णप्रवास; ९ पदकांसह पदकतालिकेत दिमाखदार कामगिरी



डकार (वृत्तसंस्था)– डकार येथे सुरू असलेल्या चौथ्या युवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारतीय युवा खेळाडूंनी दमदार कामगिरीची नोंद केली आहे. स्पर्धेच्या १२व्या दिवशी भारताने १ सुवर्ण, ३ रौप्य आणि ५ कांस्य अशी एकूण ९ पदके जिंकत पदकतालिकेत ३६वे स्थान पटकावले आहे. या स्पर्धेत १५ सुवर्णपदकांसह चीन अव्वल स्थानावर असून जपान दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतासाठी सर्वात मोठा ऐतिहासिक क्षण बॉक्सिंग रिंगमध्ये पाहायला मिळाला. पुरुषांच्या ५० किलो वजनी गटात भारताच्या लैरेनलकपम आंबेकर मैतेई याने दमदार कामगिरी करत भारताला युवा ऑलिम्पिकच्या इतिहासातील पहिले बॉक्सिंग सुवर्णपदक जिंकून दिले. याशिवाय, महिलांच्या ४८ किलो वजनी गटात गुंजनने अंतिम फेरीत प्रवेश केला असून, त्यामुळे भारताचे आणखी एक पदक निश्चित झाले आहे.

यापूर्वीच्या स्पर्धांमध्येही भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत आपली छाप पाडली आहे. बॅडमिंटनच्या महिला एकेरीत तन्वी पात्री, ज्युडोमध्ये खुशबू दर्जादा आणि बीच रेसलिंगमध्ये तानिया यांनी रौप्यपदकांची कमाई केली. जलतरणात धिनिधी देसिंघूने १०० मीटर आणि २०० मीटर फ्रीस्टाइल प्रकारांत प्रत्येकी एक कांस्यपदक जिंकले. तर तीर्थांक पेगूने २०० मीटर बटरफ्लाय प्रकारात कांस्यपदक पटकावले. थलेटिक्समध्ये शौर्या आंबुरेने १०० मीटर हर्डल्समध्ये, तर वुशूमध्ये राजकुमारी चानूने कांस्यपदक जिंकून देशाचा गौरव वाढवला.

स्पर्धेच्या १२व्या दिवशी बॉक्सिंग, सेलिंग, फुटसल, फेन्सिंग आणि तायक्वांदो या खेळांमध्ये १५ सुवर्णपदकांसाठी लढती सुरू आहेत. उद्या, १३ नोव्हेंबर रोजी या भव्य क्रीडा सोहळ्याचा समारोप होणार आहे. त्यामुळे भारताच्या पदकसंख्येत आणखी भर पडण्याची शक्यता आहे. केवळ १७ खेळाडूंच्या छोट्या ताफ्यासह स्पर्धेत सहभागी झालेल्या भारताने मिळवलेले हे यश देशाच्या युवा क्रीडा प्रतिभेची ताकद दाखवणारे ठरले आहे. भारतीय खेळाडूंच्या या कामगिरीमुळे देशाच्या क्रीडा क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्याबाबत आशा अधिक बळावल्या आहेत.

जाहीर प्रगटन

मौजे म्हाळजा ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ०४ मधील स्वामी रामानंद तीर्थ चतुर्थ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. म्हाळजा ता.जि. नांदेड येथील प्लॉट नं. १०४ साईज रूंदी- २५ फुट व लांबी ३० फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७५० चौ.फुट ज्यावर टीनशेडचे गोडाऊन (शॉप) असून सदर मालमत्ता सालेहा बेगम शमशीरखान रा. मन्यारगल्ली, चौक बाजार नांदेड संमती देणार मोहम्मद फहाद अब्दुल जलील रा. फत्तेबुरूज इतवारा नांदेड यांचेकडून डॉ. मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसुफखान रा. दुधगल्ली, कुबा मस्जिद जवळ, उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - २० फुट रूंद रोड, पश्चिमेस - प्लॉट नं. १०३, दक्षिणेस - प्लॉट नं. १०५ व उत्तरेस - खुली जागा.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत डॉ. मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसुफखान यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
डॉ. मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसुफखान
रा. दुधगल्ली, कुबा मस्जिद जवळ,
उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड

Change In Name

My old name is **JAYASHREE ASHOK NARWADE** which I am changing as New name **JAYSHREE ASHOK NARWADE**.

Henceforth my all corespondence will be done as per my new name. Please consider the same. - ADDRESS -- W/O: Ashok Narwade, Plot No 42, Ratnanuj, Swagat Nagar, Taroda Khu, Purna Road, Nanded, Taroda Bk., Nanded, Maharashtra, 431605

Change In Name


My old name as per my son birth certificate is **Risha Deshmukh.** Which is now I am changing to my new name as **Risha Satish Nagesh** henceforth all her official corresponding will be done as per new name. please consider this public decleration for indian passport purpose.

Address:-A/P kahala bk. Tq. Naigaon (kh) dist Nanded 431709 Contact:-9325152982

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



जाहीर आक्षेप

माझे पक्षकार श्री.अल्ताफ इलाही खान पि.अहमद खान रा.निजाम कॉलनी यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर आक्षेपद्वारे कळविण्यात येते कि माझे पक्षकार हे मुण्गा ता.जी.नांदेड स्थित गट क्र.१९३ क्षेत्रफळ १० हेक्टर ९१ आर या शेत जमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत आधारे सण २००६ पासून मालक व काबीजदार आहे. माझ्या पक्षकारांच्या जमिनी बाबत शकूर खान याने ऍड, विखारुद्दीन मार्फत दै.प्रजावाणी मध्ये दि.०३/११/२०२६ रोजी प्रकाशित केलेला जाहीर प्रगटन चुकीचा, खोटा व दिशाभूल करणारा आहे. मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सेकंड अपील SA/४७/२०१८ व त्या मधील अंतरिम अर्ज CA/८१०/२०१८ हे मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर नांदेड यांचे आदेश दिनांक २१/०४/२०१२ व मा.जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड यांचे आदेश दिनांक ०९/११/२०१७ च्या नाराजीने माझ्या पक्षकारद्वारे दाखल करण्यात आलेले आहे व ते सेकंड अपील व त्या मधील अंतरिम अर्ज जमिनीच्या फेरफार ७/१२ बाबत कोणतेही महसूल न्यायालयच्या आदेशच्या नाराजीने नाही. म्हणून जाहिर प्रगटन मध्ये नमुद बाब की मा.उच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश ७/१२ "जैसे थे" ठेवण्या बाबत आहे हे चुकीचे, खोटे व दिशाभूल करणारे आहे व तसेच "जैसे थे" आदेश त्यांच्या हक्कात आहे हे जाहीर करणे ही चुकीचे, खोटे व दिशाभूल करणारे आहे कारण की सेकंड अपील व त्या मधील अंतरिम अर्ज हे माझ्या पक्षकाराच्या तर्फे दाखल करण्यात आलेले आहे व ते "जैसे थे" आदेश माझ्या पक्षकार च्या हक्कात आहे व ते "जैसे थे" आदेश दिवाणी न्यायातयाच्या आदेश संबंधित आहे ७/१२ संबंधित नाही त्या "जैसे थे" आदेश मध्ये शकूर व ईतर यांच्या नावे ७/१२ असते तरी त्यांनी त्या आधारवर कोणतेही तीसरे हक्क निर्माण करण्यास मनाई व पाबंदी केलेली आहे. माझ्या पक्षकाराचे नावे २००६ पासुन असलेले फेरफार ७/१२ बेकायदेशीररित्या रद्द केल्याप्रकरणी शकूर खान व ईतर फेरफार क्र. ८०८३ मध्ये नमूद व्यक्तींविरुद्ध ग्रामीण पोलिस ठाणे नांदेड येथे गुन्हा क्र. ०२६९/२०२४ नुसार फसवणूक व ईतर कलमानुसार गुन्हा दाखल आहे. मा. उच्च न्यायातयचे "जैसे थे" आदेशचे चुकीचे अर्थ काढून महसूल विभागच्या काही कर्मचारी व अधिकारीयांशी संगनमत करून जे काही आदेश पारित करण्यात आलेले आहे त्या विरुद्ध उचित न्यायालयात व उचित वरिष्ठ अधिकारी व विभागात अर्ज व तक्रारी करण्यात आलेले आहे व ते काही यशस्वीरित्या निकाती काढण्यात ही आलेले आहे व काही प्रतंबित आहे. मूळ वादी हे माझ्या पक्षकारच्या जमिनीचे वडिलोपार्जित मालक व काबीजदार आहे असा त्यांचा दिवाणी दावा आहे व तो मा.उच्च न्यायातयात प्रतंबित असतांना मूळ वादीता मालक व कावीजदार म्हणून घोषित करून जाहीर प्रगटन प्रकाशित करणे गुन्हा आहे ही बाब संबंधित मूळ वादी व त्यांचे वकितांनी समजावे व तसे पुढे करू नये.सबब हे जाहीर आक्षेप दि.१०/११/२०२६ रोजी सर्व जनतेस व संबंधितांना कळविण्याकरिता देण्यात आलेले आहे.

जाहीर आक्षेप देणार पक्षकार: अल्ताफ इलाही खान पि. अहमद खान
पक्षकारांचे अधिवक्ता: ऍड.आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान. मो.९१३०४४९४००.

जाहिरप्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २४५/२०२६

सुलताना अहेमद पठाण व इतर वि. निरंक

अर्जदार: १. सुलताना अहेमद पठाण वय - ४० वर्षे,
२. शबाना लाल मोमम्मद सयद वय - ३७ वर्षे,
रा. कौठा ता. कंधार जिल्हा नांदेड
३. नसरीन मस्तान सयद वय - ३० वर्षे,
रा. सुगाव ता. मुखेड जिल्हा नांदेड
४. रेशना इसाखेद्दीन सयद वय - ३२ वर्षे,
रा.भोपाळा ता. नायगांव जिल्हा नांदेड
५. हजुबी चांदपाशा सयद वय - २७ वर्षे,
६. सुमैय चांदपाशा सयद वय - २० वर्षे,
७. चांदपाशा हुसेनसाब सयद वय - ३० वर्षे,
अर्जदार क्र. १,५,६,७ रा. किनाळा ता. बिलोली जिल्हा नांदेड

विरुध्द

निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **अजीजाबी चांदपाशा सयद** यांची अर्जदार क्र. ७ हा पती आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत यांचे विवाहीत मुले आहेत. हे एकत्रीत कुटुंबाचे सदस्य आहेत.अर्जदार क्र. १,५,६,७ रा. किनाळा ता. बिलोली जिल्हा नांदेड अर्जदार क्र.२.कौठा ता. कंधार जिल्हा नांदेड अर्जदार क्र.३.रा. सुगाव ता. मुखेड जिल्हा नांदेड अर्जदार क्र.४.रा.भोपाळा ता. नायगांव जिल्हा नांदेड येथे वास्तव्यास आहे. मयत **अजीजाबी चांदपाशा सयद** यांचा मृत्यु दिनांक **११/०९/२०२५** रोजी झाला. मयत **अजीजाबी चांदपाशा सयद** यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाही. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **अजीजाबी चांदपाशा सयद** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १४/१२/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि.१४ ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

उसाच्या शेतात सापळा रचून 'स्थागुशा'ची कारवाई; भररस्त्यात लुटणारे दोघे जेरबंद

जबरी चोरी, दुचाकी चोरीचे ८ गुन्हे उघडकीस



नांदेड (प्रतिनिधी)- शहरात दुचाकीवरून येऊन नागरिकांना भररस्त्यात अडवून, मारहाण व खंजिराचा धाक दाखवून लुटणाऱ्या आणि महागड्या दुचाकी चोरणाऱ्या अट्टल टोळीचा पर्दाफाश करण्यात स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे आणि पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमला यश आले आहे.

पोलिसांनी बोंडार-हवेली रोडवरील उसाच्या शेतात अत्यंत शिताफीने सापळा रचून पाठलाग करत दोन सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या कारवाईत भाग्यनगर आणि विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील २ जबरी चोरीचे गुन्हे व विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील ६ दुचाकी चोरीचे गुन्हे असे एकूण ८ गंभीर गुन्हे उघडकीस आले असून, ५ लाख ९५ हजार रुपये किंमतीच्या ६ चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

शहरात घडलेल्या जबरी चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांचे पथक दि. ९ नोव्हेंबर रोजी नांदेड शहर व ग्रामीण भागात पेट्रोलिंग करत होते. यावेळी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, चैतन्यनगर रोडवरील जबरी चोरीतील मुख्य संशयित अमेरखान उर्फ एएमके आणि शेख रेहान हे चोरीच्या दुचाकी विकण्याच्या उद्देशाने बोंडार- हवेली रोड लगतच्या उसाच्या शेताजवळ थांबले आहेत.

या माहितीच्या आधारे पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन सायंकाळच्या सुमारास उसाच्या शेताजवळ सापळा रचला. पोलीस आल्याची चाहूल लागताच दोन्ही आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क असलेल्या पथकाने पाठलाग करून त्यांना जागीच ताब्यात घेतले.

पोलिसांनी अमेरखान उर्फ एएमके उर्फ जिहादी महेफुजखान, वय २३ वर्षे, रा. इरफाननगर, गाडेगाव रोड नांदेड, शेख रेहान उर्फ चिल्ला शेख महेबुब, वय १९ वर्षे, रा. मिल्लतनगर नांदेड यांना अटक केली.

कसून चौकशीत त्यांनी इतर साथीदार ऋषी वाठोरे, शेख गौस आणि कुणाल आंदे यांच्या मदतीने दोन जबरी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

१) चैतन्यनगर रोड जबरी चोरी : दोन दिवसांपूर्वी चैतन्यनगर रोडवर चोरीच्या मोटारसायकलवरून येऊन एका व्यक्तीला मारहाण करत त्याच्या हातातील अंगठी लुटून नेली होती. (पो. स्टे. भाग्यनगर गु.र.नं. ६५४/२०२६)

आसना ब्रिज जबरी चोरी : दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास फिर्यादी प्रभू काळाबा मोरे, वय ६० वर्षे, रा. गौतमनगर, सांगवी बु., नांदेड हे भाजीपाला आणण्यासाठी इतवारा येथे जात होते. आसना ब्रिजजवळ आरोपींनी दुचाकी आडवी लावून त्यांना खाली पाडले. त्यानंतर खंजिराचा धाक दाखवून, जिवे मारण्याची धमकी देत खिशातील रोख ५ हजार २०० रुपये जबरीने हिसकावून नेले होते. (पो.स्टे. विमानतळ गु.र.नं. ५६१/२०२६)

झाडाझुडपात लपवलेल्या ६ बाईक सापडल्या

तपासात आरोपींनी सहयोगनगर (नांदेड), नरसी, बडुरफाटा (बिलोली), खुदबेनगर, कामठा माळटेकडी आणि स्वयंवर मंगल कार्यालय अशा विविध ठिकाणांहून ६ दुचाकी चोरल्याचे सांगितले. सर्व ६ चोरीच्या दुचाकी बोंडार-हवेली रोड लगत उसाच्या शेताशेजारील दाट झाडाझुडपात लपवून ठेवल्या होत्या. पथकाने घटनास्थळी जाऊन त्या सर्व शोधून काढल्या.

भाग्यनगर ६५५/२०२६ बजाज मो. सा. ७० हजार, रामतीर्थ २३०/२०२६ बजाज पल्सर-२२० ७० हजार, भाग्यनगर ६५९/२०२६ बजाज पल्सर-२२० ७० हजार, विमानतळ ५६२/२०२६ हिरो स्प्लेंडर ४५ हजार, बिलोली २५०/२०२६ येझदी रोडस्टर २ लाख ५० हजार आणि नांदेड ग्रामीण १४३८/२०२६ रॉयल एनफिल्ड १ लाख. दोन्ही आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कारवाईसाठी भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याची मागणी

किनवट (प्रतिनिधी)- केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनाही १ जुलै २०२६ पासून तीन टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करावा, तसेच मागील चार महिन्यांची थकबाकी चालू महिन्याच्या वेतनासोबत रोखीने अदा करावी, अशी मागणी शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी समन्वय समिती, तालुका समन्वय किनवट-माहूर यांच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ९ नोव्हेंबर २०२६ रोजी निवेदन सादर केले आहे. निवेदनात केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात तीन टक्क्यांची वाढ मंजूर करून तो ६० टक्क्यांवरून ६३ टक्के केला आहे. त्याच धर्तीवर राज्य कर्मचाऱ्यांनाही वाढीव महागाई भत्ता लागू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्य कर्मचाऱ्यांना १ जुलै २०२६ पासून तीन टक्के वाढीव महागाई भत्ता मंजूर करून जुलै ते ऑक्टोबर या चार महिन्यांची थकबाकी नोव्हेंबर २०२६ च्या वेतनासोबत अदा करावी. यामुळे कर्मचाऱ्यांची आर्थिक अडचण दूर होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ज्येष्ठ पत्रकार गणेश कस्तुरे यांचे निधन

३३ वर्षांच्या शैक्षणिक सेवेसह पत्रकारितेतही उमटवला स्वतंत्र ठसा



नांदेड (प्रतिनिधी)- ज्येष्ठ पत्रकार तथा शिक्षक गणेश कस्तुरे (वय ५३) यांचे सोमवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा वाजता दीर्घ आजाराने उपचारादरम्यान निधन झाले. मंगळवार, दि. १० नोव्हेंबर रोजी दुपारी गोवर्धन घाट येथील शांती धाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

गणेश कस्तुरे हे गेल्या ३३ वर्षांपासून स्वामी रामानंद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. अध्यापनाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविण्याचे काम त्यांनी केले. शिक्षण क्षेत्रातील योगदानासोबतच त्यांनी पत्रकारितेतही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.

सामना, मराठवाडा, गावकरी, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स यांसारख्या नामांकित वृत्तपत्रांसाठी त्यांनी बातमीदार म्हणून काम केले. गुन्हेगारी, राजकीय, सामाजिक तसेच विकासात्मक विषयांवर त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रभावीपणे प्रकाश टाकला. निर्भीड, अभ्यासपूर्ण आणि वस्तुनिष्ठ पत्रकारितेमुळे त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला होता.

पत्रकारिता आणि अध्यापन अशा दोन्ही क्षेत्रांत कार्यरत राहून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. गेल्या काही दिवसांपासून ते आजाराने ग्रस्त होते.

त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार आहे. संपादक केशव घोणसे पाटील, माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी, भाजपचे प्रवीण साले, लातूरचे नगरसेवक कस्तुरे यांनी आपल्या श्रद्धांजलीपर भावना व्यक्त केल्या. अंत्यसंस्काराला विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक, मित्रमंडळी, पत्रकार उपस्थित होते.

खा. अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत काँग्रेस-राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश



नांदेड (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वावर तसेच भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करत भोकर तालुक्यातील रावणगाव येथील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष विजय कदम, काँग्रेसचेच गंगाधरराव कदम, युवक काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष रविकांत कदम आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नांदेड उत्तर जिल्ह्याचे कार्यालयीन सचिव गिरीश कदम यांचा समावेश आहे.

याप्रसंगी आमदार श्रीजया चव्हाण, भाजप नांदेड महानगराध्यक्ष आमदार अमरनाथ राजूरकर, जगदीश पाटील भोसीकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष दिवाकर रेड्डी, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, जिल्हा बँकेचे संचालक रामचंद्र मुसळे, किशोर पाटील लगळूदकर यांच्यासह पक्षाचे इतर पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. खा. अशोकराव चव्हाण यांनी पक्षात नव्याने सहभागी झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे भाजप परिवारात स्वागत केले.

नांदेड आगाराला ५ नव्या 'जिजाऊ' बसेसची भेट; आमदारांच्या हस्ते लोकार्पण



नांदेड (प्रतिनिधी)- दिवाळीच्या शुभपर्वावर नांदेडकरांच्या सेवेत आणखी ५ नव्या बसेस दाखल झाल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने नांदेड आगाराला नव्याने प्राप्त झालेल्या ५ 'जिजाऊ' बसेसचा लोकार्पण सोहळा आमदार बालाजीराव कल्याणकर आणि आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते संपन्न झाला. या पाचही बसेस आजपासून नांदेडकरांच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. यावेळी दोन्ही आमदारांनी स्वतः बसमध्ये प्रवास करून बसेसचा अनुभव घेतला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, विभाग नियंत्रक अभय देशमुख, आगार प्रमुख अभिजीत कोरटकर, बसस्थानक प्रमुख यासीन खान, सहायक वाहतूक अधीक्षक सचिनसिंह चौहान, कैवल्य बासवाडेकर, बोधनकर, प्रभाकर यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. नांदेडकरांचा प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित आणि आरामदायी व्हावा, हाच या उपक्रमामागील उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

पत्रकार गणेश कस्तुरे आणि प्रदीप वाकोडीकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवारी नांदेडमध्ये शोकसभा





नांदेड (प्रतिनिधी)- दैनिक महाराष्ट्र टाइम्सचे ज्येष्ठ पत्रकार गणेश कस्तुरे आणि दैनिक देशोन्नतीचे किनवट प्रतिनिधी प्रदीप वाकोडीकर यांचे नुकतेच निधन झाले. दिवंगत पत्रकारांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी नांदेड येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही शोकसभा रविवारी सायंकाळी ५.३० वाजता नाना-नानी पार्कमधील कै. सुधाकरराव डोईफोडे सभागृह, शिवाजीनगर पोलीस ठाण्यामागे नांदेड येथे होणार आहे.

या शोकसभेत दिवंगत पत्रकारांच्या स्मृतींना उजाळा देऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांनी या शोकसभेस उपस्थित राहून दिवंगत पत्रकारांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन समस्त पत्रकार बांधव, नांदेड जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतीय सोयाबीन प्रक्रिया संघटनेच्या अध्यक्षपदी नरेश गोयंका यांची निवड

मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या हस्ते गौरव



नवीन नांदेड (प्रतिनिधी)- भारतातील सोयाबीन प्रक्रिया उद्योगातील अग्रगण्य संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय सोयाबीन प्रक्रिया संघटनेच्या अध्यक्षपदी नांदेड येथील सुप्रसिद्ध उद्योजक तथा साई सिमरन ऑईल मिलचे मालक नरेश गोयंका यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीनिमित्त SOP संघटनेच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव व मंत्री तुलसी सिलावट यांच्या हस्ते नरेश गोयंका यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

नरेश गोयंका यांच्या या निवडीमुळे नांदेडच्या औद्योगिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या निवडीबद्दल नांदेड येथील उद्योजक नंदकुमार महाजन, अली सेठ, श्रीनिवास मेडेवार व सिनू सेठ यांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नांदेडच्या उद्योग क्षेत्रातून राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गोयंका यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

धावत्या रेल्वेगाडीतून पडून एकाचा मृत्यू; दुसरा गंभीर



किनवट (प्रतिनिधी)- दिवाळीचा सण संपल्यानंतर उदरनिर्वाहासाठी आदिलाबादकडे निघालेले दोन युवक धावत्या गाडीतून खाली कोसळले. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्घटना मदनापूर रेल्वे स्थानकाजवळ गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी घडली.

हदगाव तालुक्यातील नावा येथील रहिवाशी बंडू देशमुखे आणि विश्वंभर देशमुखे (अंदाजे वय २० ते ३० वर्षे) हे दोघेही दिवाळीनंतर स्थानिक भागात रोजगाराची संधी नसल्याने तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतात काम उपलब्ध नसल्याने ते कापूस वेचणीच्या कामासाठी आदिलाबादकडे निघाले होते. दरम्यान, सकाळी ११ वाजताच्या सुमारास परळीहून आदिलाबादकडे जाणाऱ्या पॅसेंजर रेल्वेतून प्रवास करताना मदनापूर रेल्वे स्थानकाजवळ दोघेही रेल्वेच्या दरवाजातून खाली पडले. या दुर्घटनेत बंडू देशमुखे यांचा मृत्यू झाला, तर विश्वंभर देशमुखे गंभीर जखमी झाला. दुर्घटनेनंतर दोघांनाही किनवट रेल्वे स्थानकावर आणण्यात आले. मात्र, तोपर्यंत बंडू देशमुखे यांची प्राणज्योत मालवली होती. गंभीर जखमी विश्वंभर देशमुखे यांना पुढील उपचारासाठी गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

शिक्षक गणेश जाधव यांना मातृशोक



नांदेड (प्रतिनिधी)- येथील नवीन नांदेड भागातील रहिवाशी तथा ज्येष्ठ नागरिक श्रीमती आशाबाई आनंदराव जाधव यांचे मंगळवार, दि. १० नोव्हेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

श्रीमती आशाबाई जाधव ह्या सिडको येथील शिवाजी हायस्कूलमधील शिक्षक गणेश यांच्या मातोश्री तर आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव व सामाजिक कार्यकर्ते रमेश जाधव यांच्या त्या काकू होत.

त्यांच्या पार्थिव देहावर बुधवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी त्यांच्या मूळगावी मुखेड तालुक्यातील होनवडज येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

आनंदाचा शिधा स्मिता पाटील यांचा प्रेरणादायी उपक्रम -माजी मंत्री कमलकिशोर कदम



नांदेड (प्रतिनिधी)- दुष्काळामुळे शेतकरी, शेतमजूर त्रस्त झाले असताना दिवाळी सणात सौ. स्मिता धनराज पाटील यांनी आनंदाचा शिधा वाटून सर्वसामान्य नागरिकांची दिवाळी गोड केली आहे. हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम यांनी केले.

नांदेड तालुक्यातील निळा येथे सौ. स्मिता धनराज पाटील यांच्यावतीने दि. ९ नोव्हेंबर रोजी दिवाळी सणानिमित्त आणि दुष्काळाच्या पार्श्वभूमी गरजू नागरिकांसाठी अनेकांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. यावेळी कदम बोलत होते. या आयोजित कार्यक्रमास राज्याचे माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम, माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर, नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, बाबुराव जोगदंड, सौ. जयश्री आलेगावकर, सौ. स्मिता पाटील, धनराज पाटील, सौ. निलाबाई जोगदंड, गोविंदराव जोगदंड, कोंडीबा जोगदंड, शिवाजी गुरूजी, माजी सभापती लक्ष्मण इंगोले, ग्यानोबाराव कदम, तातेराव पाटील आलेगावकर, उत्तमराव पाटील आलेगावकर, किरण जोगदंड यांच्यासह आदी जणांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना कमलकिशोर कदम म्हणाले की, मराठवाड्यामध्ये पावसाचे अत्यल्प प्रमाण पाहता दुष्काळ जाहीर केलेला आहे. या दुष्काळामुळे शेतमजूर, शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. दिवाळी सण कसा साजरा करावा हा प्रश्न ग्रामीण भागातील नागरिकांना पडला होता. परंतु भगवानराव पाटील आलेगावकर यांच्या कन्या सौ. स्मिता धनराज पाटील यांनी दुष्काळामध्ये आनंदाचा शिधा हा उपक्रम राबवून गरीब, कष्टकरी नागरिकांची दिवाळी गोड केली आहे. हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे कदम यांनी सांगितले. तर माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांनी सांगितले की, दुष्काळामुळे ग्रामीण भागातील नागरिक अडचणीत आलेला आहे. अशा परिस्थितीत सौ. स्मिता पाटील यांनी आपल्या भागातील नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी आनंदाचा शिधा उपक्रम राबविला. या उपक्रमातून त्यांना दिवाळी सण साजरा करण्यासाठी आधार मिळाला आहे असेही त्यांनी सांगितले. तर आ. बालाजीराव कल्याणकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. तर कार्यक्रमाचे आयोजक सौ. स्मिता धनराज पाटील यांनी सांगितले की, दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे आणि सामाजिक भान लक्षात घेता आनंदाचा शिधा हा उपक्रम राबविला आहे.

किसनबाई सोनकांबळे यांचे निधन



नांदेड (प्रतिनिधी)- सिडको परिसरातील शाहू नगर येथील ज्येष्ठ नागरिक तथा स्वातंत्र्य सैनिक किसनबाई गोविंदराव सोनकांबळे (कल्हाळीकर) यांचे मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. स्वातंत्र्य सैनिक किसनबाई गोविंदराव सोनकांबळे यांच्या पार्थिवावर सिडको परिसरातील स्मशानभूमीमध्ये संध्याकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. लीड बँकेचे मुख्य प्रबंधक बाबुराव सोनकांबळे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, नातू, पणतू असा परिवार आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com